POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२०७ ● मुंबई, शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA



# दहा वर्षांत अर्थव्यवस्था तिप्पट

## राज्य ५ लाख कोटी डॉलरचा टप्पा गाठणारच - फडणवीसांचा विश्वास

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

गेल्या दहा वर्षांमध्ये राज्याची अर्थव्यवस्था तीन पटीने वाढली असून हाच वेग कायम ठेवून आपण पाच ट्रिलियनचा टप्पा गाठू असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी व्यक्त केला. राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना विधानसभेत त्यांनी चौफेर टोलेबाजी केली. राज्याच्या अर्थव्यवस्थेचे आकारमान २०४७ पर्यंत पाच लाख कोटी अर्थात ट्रिलियन डॉलरपर्यंत न्यायची असून त्यातून दरवर्षी १० लाख रोजगार तयार करायचे आहेत, असे नमूद करून फडणवीस म्हणाले की, वित्तीय शिस्त पाळून वित्तीय तूट अडीच टक्क्यांखाली आणायची आहे. यासाठी राज्यात शंभर उपक्रम घेतले असून त्याचे व्हिजन मॅनेजमेंट तयार केले आहे. मॅकेन्जीसारख्या कंपनीचा सल्ला त्यासाठी घेत आहोत. हे पुस्तक तयार करण्याइतके सोपे नाही. बजेट ट्रिलियन डॉलर नाही करायचे, अर्थव्यवस्था तयार करायची आहे. आज अर्थव्यवस्था ५१ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे, आणखी ४० लाख कोटींपर्यंत विस्तारीत करायची आहे. सन २०१२-१३ मध्ये अर्थव्यवस्था तेरा लाख कोटी होती. आता ती तिप्पट झाली आहे. जगात काही देशांची अर्थव्यवस्था देखील ट्रिलियन डॉलर नाही, असेही ते म्हणाले.

**कुंभमेळ्यामुळे ब्रँडिंग :** कुंभमेळ्याबाबतच्या आक्षेपांना उत्तर देताना ते म्हणाले की, कुंभमेळा हा दर साडेबारा वर्षांनी येणारा आहे. जगात इतक्या मोठ्या प्रमाणात कुठेही मेळावा होत नाही. ज्या व्यवस्था आपण करतोय, त्या कुंभ मेळ्यापुरत्या मर्यादित नाहीत. पर्यावरणसाठी उपाययोजना करतोय. रस्ते रुंदीकरण, एअरपोर्ट, रिंग रोड करतोय. त्यामुळे धार्मिक व इतर पर्यटन वाढेल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

**ह्ययुवा प्रशिक्षण म्हणजे पर्मनंट नोकरी नाहीह्ल :** भास्कर जाधव यांनी युवा प्रशिक्षण अभियानाबाबत काही आक्षेप नोंदवले होते. त्याबाबत खुलासा करताना मुख्यमंत्री म्हणाले की, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण अभियान हे ११ महिन्यांसाठी असणार ते आधीच घोषित केले होते, इतरत्र नोकरीला जाताना उमेदवारांना फायदा व्हावा यासाठी त्यांना अनुभवपत्र देण्यात आले होते. प्रशिक्षणार्थी युवकांना पर्मनंट करणार हे सांगितल्याचे भास्कर जाधव म्हणाले. तसे रेकॉर्ड असेल तर पाठवून द्या, असे आव्हान मुख्यमंत्र्यांनी दिले. चांगल्याला चांगलं म्हणायला शिका.

**ट्रम्पही दावोसमध्ये राहतात :** मुख्यमंत्र्यांच्या दावोस दौऱ्यावर विरोधकांनी टीका केली होती. त्याचाही त्यांनी समाचार घेतला. ते म्हणाले की, पूर्वी सत्तेत असताना आदित्य ठाकरे यांनीही डावोस दौरा करून करार केला होता. त्याचे फोटो आहेत. डावोस हे छोटे गाव असले तरी डोनाल्ड ट्रम्पदेखील तिथे दोन-दोन दिवस राहतात. जगासोबत चालायचं आहे तर तुम्हाला तिथे राहावंच लागतं. राज्याची मोठी चर्चा तिथे होते. कंपन्यांचे परकीय गुंतवणूकदार असतात त्यांची इच्छा असते करार तिथे व्हावे. कंपन्या तिथे आपल्या बैठका ठेवतात, थेट परदेशी कंपन्या आपल्याकडे येत नाहीत. मंत्रालयात बोलावूनही करार करता येतात. पण, उत्सव केला की लोकांपर्यंत पोहोचता येतं, मार्केटिंग होतं, अधिक लोकांपर्यंत पोहोचता येतं.

# आता जिल्हा परिषदेतही स्वीकृत सदस्य... राज्य मंत्रिमंडळाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**■मुंबई। प्रतिनिधी,**

महापालिका आणि नगरपालिकांप्रमाणेच जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीत स्वीकृत सदस्य नियुक्त करण्याचा निर्णय गुरुवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयानुसार जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या १० टक्के तर पंचायत समितीमध्ये २० टक्के स्वीकृत सदस्य नियुक्त होतील. त्यामुळे निवडणूक लढवण्याची संधी न मिळालेल्या किंवा निवडणुकीत पराभूत झालेल्या उमेदवारांच्या राजकीय पुनर्वसनाचा मार्ग मोकळा होणार आहे.



ग्रामीण भागात अनेक लोकप्रतिनिधी आणि तज्ज्ञ व्यक्ती विविध सामाजिक क्षेत्रांत उत्तम काम करतात. मात्र, जिल्हा परिषद निवडणुकीत महिला आरक्षण किंवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसी आरक्षणामुळे अनेक अनुभवी तसेच अभ्यासू व्यक्तींना निवडणूक लढवता येत नाही. अशा परिस्थितीत, या तज्ज्ञ लोकांच्या अनुभवाचा फायदा ग्रामीण विकासासाठी व्हावा, या हेतूने त्यांना 'स्वीकृत सदस्य' म्हणून संधी दिली जावी, असा प्रस्ताव महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला होता.या पार्श्वभूमीवर बावनकुळे यांच्या प्रस्तावाला आजच्या बैठकीत मंजुरी मिळाली. आता यासंदभार्तील कायदा याच अधिवेशनात मंजूर केला जाई, अशी शक्यता आहे.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या १० टक्के तर पंचायत समितीत सदस्य संख्येमागे २० टक्के स्वीकृत सदस्य निवडले जातील. प्रत्येक जिल्हा परिषदेत किमान ५ तर पंचायत समितीमध्ये किमान २ सदस्य निवडणे बंधनकारक राहील. प्रत्येक जिल्ह्यांत आणि तालुक्यात लोकसंख्येच्या प्रमाणात जिल्हा परिषद गट आणि पंचायत समितीचे गण निर्माण केले जातात. त्यामुळे जिल्हा परिषदेत किमान ५, तर जास्तीत ७ स्वीकृत सदस्य नेमले जाऊ शकतात. दुसरीकडे, पंचायत समितीमध्ये किमान २ आणि जास्तीत जास्त ४ स्वीकृत सदस्य नियुक्त केले जातील.

# राज्यभरातील आयव्हीएफ, सोनोग्राफी केंद्रांची तपासणी होणार

## बदलापूर येथे रूपाली चाकणकर यांची माहिती



**■बदलापूर। प्रतिनिधी,**

स्त्री बीज विक्रीचा विषय केवळ बदलापुरपुरता मर्यादित नसून त्याची पाळेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात पसरलेली आहेत. ही पाळेमुळे खोदून काढण्यासाठी राज्यभरातील बेकायदेशीर आयव्हीएफ व सोनोग्राफी केंद्रांवर धाडसत्र सुरू करणार असल्याची माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी दिली.

अवैधरित्या स्त्री बीज विक्रीचे प्रकरण बदलापुरात उघडकीस आल्यानंतर राज्यात खळबळ उडाली. गरजू महिलांना पैशांचे आमीष दाखवून त्यांच्या शरीरात स्त्रीबीज विकसित करून ते काढून विक्री करण्याचा बेकायदेशीर प्रकार स्थानिक पोलीस आणि शासकीय आरोग्य यंत्रणेने उघडकीस आणला. त्यानंतर या प्रकरणामागील मोठे रॅकेट समोर येत आहे. सुरुवातीला तीन महिलांना अटक करण्यात आली होती, त्यानंतर आणखी दोघांना अटक करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर, या प्रकरणाचा आढावा घेण्यासाठी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी गुरुवारी कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेला भेट दिली. यावेळी त्यांनी बेकायदेशीर आयव्हीएफ आणि सोनोग्राफी केंद्रांच्या तपासणीचे आदेश दिले. यावेळी पोलीस उपायुक्त सचिन गोरे, जिल्हा शल्यचिकित्सक कैलास पवार, नगराध्यक्षा रुचिता घोरपडे, उपनगराध्यक्षा प्रियांका दामले यांनी प्रकरणाची माहिती रूपाली चाकणकर यांना दिली.

"या प्रकरणातील आरोपी काही दिवसांपूर्वी बदलापुरात आले होते. नाशिकमध्ये नोंदणी असलेले मात्र ठाण्यात सुरू असलेले एक आयव्हीएफ केंद्र या विक्री प्रकरणात सक्रीय असून त्यावर कारवाई करण्यात आली आहे. एका महिलेने आधारकार्ड बदलून ओळख लपवत प्रवास केल्याचेही तपासात समोर आले आहे तसेच कोणतीही वैद्यकीय पार्श्वभूमी नसलेल्या महिलांकडून इंजेक्शन देणे, औषधे देणे अशा वैद्यकीय प्रक्रिया केल्या जात होत्या. दलाल महिलाच सर्व वैद्यकीय काम करत असल्याने हा प्रकार महिलांच्या जीवाशी खेळ करणारा आहे."

**-रूपाली चाकणकर, अध्यक्षा, राज्य महिला आयोग**

# फिजिक्स-केमिस्ट्रीनंतर आता १२ वीचा गणिताचा पेपर सुद्धा फुटला!

## गुन्हा दाखल होऊनही पेपरफुटी सुरूच...

**■मुंबई। प्रतिनिधी,**

नागपुरात पेपरफुटीचं आणखी एक धक्कादायक प्रकरण समोर आलं आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर देखील १२ वी परीक्षेतील गणिताचा पेपर फोडल्याचं टेक्निकल तपासातून समोर आलं आहे. पोलिसांनी जप्त मोबाईलचा डिलीट केलेला डेटा रिकव्हर केला असून या रिकव्हर केलेल्या डेटा मधून गणिताचाही पेपर फोडल्याची माहिती समोर आली आहे.

काही दिवसांपूर्वी, बारावीच्या विज्ञान शाखेचे केमिस्ट्री आणि फिजिक्स या दोन विषयांचे पेपर फुटल्याचं वृत्त समोर आलं होतं. नागपूरच्या सेंट उसुर्ला या परीक्षा केंद्रावर बारावीचा केमिस्ट्री आणि फिजिक्सचा पेपर व्हाट्सएपवर लीक झाल्याचं त्यावेळी उघड झालं होतं याप्रकरणी नागपुरच्या सदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, पोलीस याबाबत तपास सुरू असतानाच आता १२ वी बोडार्चा गणित विषयाचा पेपर फुटल्याचं समोर येत आहे.




ही बातमी समोर आल्यानंतर पोलिसांनी याबाबत गुन्हा दाखल करत तपास सुरू केल्याची माहिती आहे. दरम्यान या प्रकरणी कोचिंग क्लासचे शिक्षक निशिकांत मुन, एक्सलेंट कोचिंग क्लास संचालक मुस्तफा खान आणि जुनेद मोहम्मद यांना अटक केल्याचं सांगण्यात येत आहे. मात्र, संशयितांना अटक केली असली तरी या पेपर फुटीचा मुख्य सूत्रधार अद्याप पोलिसांच्या हाती लागला नाही. या पेपरफुटीच्या तपासासाठी पोलिसांनी एसआयटी स्थापन केली असून मुख्य सूत्रधार हाती लागल्यावरच अनेक प्रश्नांचा उलगडा होणार आहे. गणिताच्या पेपरफुटीचं प्रकरण समोर आल्यानंतर यासंबंधी पाचव्या आरोपीला पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. यापूर्वी चार आरोपींमध्ये विद्यार्थ्यासह कोचिंग क्लास शिक्षकाला पोलिसांनी ताब्यात घेतलं होतं. दरम्यान, प्रकरणातील पाचवा आरोपी हा खाजगी ट्युशन क्लासेसशी संबंधित असल्याची माहिती आहे.

### नागपूर विभागीय शिक्षण बोर्डाच्या अध्यक्षांची प्रतिक्रिया

आता, या पेपरफुटी प्रकरणाबाबत नागपुर विभागीय शिक्षण बोडार्चे अध्यक्ष डॉ. शिवलिंग पटले यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करत सांगितलं की, "पेपर फुटी प्रकरणांत दोन विद्यार्थ्यांचे मोबाईल ताब्यात घेतलं असून त्यावर संशोधन सुरू आहे. आधी दोन विषयांचे पेपर फुटल्यानंतर आता गणिताचा पेपर फुटल्याचं आढळुन आलं. त्यावर पोलिस शोध घेत आहेत. तसेच आम्ही पण बोर्डाच्या नियमानुसार काम करत आहोत. सध्या, पोलिसांचा तपास सुरू, काही जणांना यामध्ये अटक झाली आहे. तपासाअंती दोषींवर कारवाई नक्की केली जाणार. पेपर पॅकिंग विद्यार्थ्यांसमोर फोडली जाते, जर कमी प्रश्नपत्रिका आली तर लगेच पंचनामा केला जातो. अकरा वाजण्याआधी प्रश्नपत्रिका कोणालाही पहायला मिळत नसते, त्यामुळे यामध्ये कोणतंही गैरप्रकार होत नसतो."

# जालन्यात देहविक्रय अड्ड्यांवर पोलिसांची छापेमारी

## चार बांग्लादेशी महिला ताब्यात... राष्ट्रगीत गायला लावलं अन्...

**■मुंबई। प्रतिनिधी,**

बेकायदेशीर बांग्लादेशींचा मुद्दा सध्या राज्यभर चर्चेत आहे. अशातच जालन्यातून एक खळबळजनक बातमी समोर येत आहे. जालन्यातील एका देहविक्रय अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकला असता धक्कादायक माहिती समोर आली आहे. या कारवाईत ताब्यात घेतलेल्या महिलांपैकी ४ महिला बांगलादेशी नागरिक असल्याचे निष्पन्न झाले आहे. जालना शहरातील बसस्थानक परिसर गेल्या काही काळापासून अनैतिक व्यवसायांसाठी चर्चेत आहे. तिथे पोलिसांनी विशेष मोहीम राबवून मोठी छापेमारी केली. बसस्थानकापासून दीड किलोमीटरच्या परिघात असलेल्या २४ लॉजपैकी दोन लॉजवर पोलिसांनी ही धडक कारवाई केली, ज्यामध्ये ७ पुरुषांसह १३ महिलांना ताब्यात घेण्यात आले.

### याआधी मुंबई अन् पुण्यात वास्तव्य

तपासात असे समोर आले आहे की, या महिला जालना येथे येण्यापूर्वी मुंबई आणि पुणे यांसारख्या शहरांमध्ये वास्तव्यास होत्या. आपली खरी ओळख लपवण्यासाठी त्यांनी बनावट आधार कार्ड आणि बनावट सिम कार्डचा वापर केला होता. मानवी तस्करीच्या माध्यमातून त्यांना जालन्यात आणले गेल्याचा संशय पोलिसांना आहे. या महिलांकडील मोबाईल फोन जप्त करण्यात आले असून, पुराव्यांच्या आधारे त्यांचे आंतरराष्ट्रीय संपर्क आणि यामागील मोठ्या रॅकेटचा शोध घेतला जात आहे.

### पोलिस प्रशासनाने काय सांगितले?

सध्या या आरोपी महिलांना न्यायालयात हजर केले असता, त्यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे. या महिला बांगलादेशातून भारतात नेमक्या कोणत्या मार्गाने आल्या आणि त्यांना जालन्यापर्यंत पोहोचवण्यात कोणाकोणाचा हात आहे, याचा तपास पोलीस करत आहेत. बनावट कागदपत्रे तयार करणाऱ्या टोळीवर आणि अवैध घुसखोरीला मदत करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.




### राष्ट्रगीत गाता आले नाही

चौकशीदरम्यान यातील चार महिलांच्या बोलण्याच्या पद्धतीवरून पोलिसांना संशय आला. सुरुवातीला या महिलांनी स्वतःला भारतीय नागरिक असल्याचे सांगत वैध कागदपत्रे असल्याचे दावे केले. मात्र, त्यांनी सादर केलेले आधार कार्ड तपासले असता ते बनावट असल्याचे आढळून आले. पोलिसांचा संशय बळावल्यावर त्यांनी या महिलांना भारताचे राष्ट्रगीत म्हणायला सांगितले, परंतु त्यांना राष्ट्रगीत गाता आले नाही. अखेर कडक चौकशीनंतर या महिलांनी आपण बांगलादेशी नागरिक असून अवैध मार्गाने भारतात प्रवेश केल्याची कबुली दिली.

# मॅट्रिमोनिअल साइटवर महिलांशी ओळख, नंतर लैंगिक शोषण अन् पैसे सुद्धा उकळले!

## पोलिसांनी केला पर्दाफाश



**■पुणे। प्रतिनिधी,**

मॅट्रिमोनिअल वेबसाइटच्या माध्यमातून महिलांशी ओळख करून त्यांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत नवी मुंबई पोलिसांच्या क्राइम ब्रांचने दोन आरोपींना अटक केल्याचं वृत्त समोर आलं आहे. आरोपी आपली खोटी ओळख सांगून महिलांशी ओळख करायचे आणि त्यांच्याकडून पैसे उकळत असल्याचा आरोप देखील करण्यात आला आहे.

### लग्नाचं आमिष दाखवून महिलांची फसवणूक

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी पीडित महिलांना लग्नाचं आमिष दाखवून महिलांशी संपर्क साधायचे आणि त्यांचा विश्वास संपादन करायचे. त्यानंतर, एकत्र भविष्य घडवण्याचे आणि घर किंवा फ्लॅट खरेदी करण्याचं स्वप्न दाखवून, महिलांना त्यांच्या नावावर 'Pre Approved Personal Loan' कर्ज घेण्यास प्रवृत्त केलं गेलं. त्यानंतर कर्जाची रक्कम आरोपी आपल्या खात्यात ट्रान्सफर करून घ्यायचे. काही प्रकरणांमध्ये, लैंगिक शोषणाचे आरोप समोर आले आहेत.

### आरोपींकडून ८९ लाख ४० हजार रुपये जप्त

या धक्कादायक प्रकरणात नवी मुंबई, पनवेल, ठाणे, मुंबई आणि पुणे येथील विविध पोलीस स्टेशनमध्ये भारतीय दंड संहिता आणि आयटी ॲक्ट अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. प्राथमिक तपासातून तक्रारदार आणि इतर चार महिला साक्षीदारांची लाखो रुपयांची फसवणूक झाल्याचं समोर आलं आहे. पोलिसांनी आरोपींकडून आतापर्यंत ८९ लाख ४० हजार रुपये जप्त केले आहेत. तसेच, आरोपीने गोव्यातील एका कॅसिनोमध्ये मोठ्या प्रमाणात पैसे खर्च केल्याचंही सांगितलं जात आहे. आदर्श प्रशांत म्हात्रे (३४ वर्षे) आणि प्रेम किरण म्हात्रे (२९) अशी आरोपींची ओळख समोर आली असून आरोपींकडून आर्थिक व्यवहारांशी संबंधित कागदपत्रे आणि डिजिटल पुरावे जप्त करण्यात आले आहेत. तसेच, संबंधित प्रकरणाचा पुढील तपास सुरू असल्याची माहिती आहे. आता, पोलिसांनी नागरिकांना आवाहन केलं आहे की, मॅट्रिमोनियल साईटवर दिसणाऱ्या ओळखीच्या प्रोफाइलवर लगेच कोणावरही विश्वास ठेवू नका आणि कोणत्याही प्रकारचे आर्थिक व्यवहार करताना अत्यंत सावधगिरी बाळगा.

# पाचवीत शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीवर बसमध्ये विनयभंग, पीडितेनं सांगितला घटनेचा थरार

### विद्यार्थिनीच्या विनयभंगामुळे आरोपीच्या मुसक्या आवळल्या

पीडितेनं घरी पोहोचताच घडलेला घटनाक्रम पालकांना सांगितला. त्यानंतर पीडितेच्या पालकांनी मध्यरात्री बदलापूर पश्चिम पोलीस ठाणे गाठून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. या प्रकरणी पोलिसांनी तात्काळ कारवाई करत वांगणीत राहणाऱ्या आरोपीच्या मुसक्या आवळल्या. संबंधित आरोपी हा गेली आठ वर्षांपासून बस ड्रायव्हर म्हणून करत होता.

**■बदलापूर। प्रतिनिधी,**

बदलापूर शहरात इयत्ता पाचवीत शिक्षण घेणाऱ्या एका अल्पवयीन विद्यार्थिनीवर शाळेच्या बस चालकाने विनयभंग केला. या प्रकरणी ३८ वर्षीय बस चालक जयेश मुने याला पोलिसांनी अटक करून कल्याण न्यायालयात हजर करण्यात आले. या प्रकरणात आरोपीला २ मार्चपर्यंत पोलीस कोठडीत सुनावली आहे. ही घटना बुधवारी सायंकाळी शाळा सुटल्यानंतर घडल्याचे वृत्त आहे.



### विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

अशा घटनेनं लहान विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. बसमध्ये शाळेतील विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी महिला मदतनीस असणे गरजेचे आहे. ही घटना घडली तेव्हा बसमध्ये महिला मदतनीस नव्हती, त्या महिलेच्या अनुपस्थितीमुळे अशी लज्जास्पद घटना घडली. या प्रकरणी आता पोलिसांनी बस मालक तसेच शाळा व्यवस्थापनालाही नोटीस बजावून चौकशीसाठी बोलावले आहे.

या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस आयुक्त शैलेश काळे यांच्याकडे सोपवण्यात आला. आरोपीने इतर आणखी किती विद्यार्थिनींसोबत असे कृत्य केले याचा पोलीस तपास घेत आहेत. आरोपीच्या मोबाईलचे पुरावे तपासले जात असून संभाव्य पीडितांचा शोध घेतला जात आहे.



# संपादकीय


संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## आर्थिक शिस्तीची गरज

देशातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेल्या महाराष्ट्र राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू झाले. आजही महाराष्ट्र सर्वाधिक थेट परकीय गुंतवणुकीसाठी पहिल्या पसंतीचे राज्य आहे. देशाच्या एकूण सकल घरेलू उत्पन्नात (जीडीपी) महाराष्ट्राचा वाटा १५.४ टक्के एवढा आहे. राज्यावर ९ लाख कोटींचे विक्रमी कर्ज आहे, मात्र राज्याची अर्थव्यवस्था ते पेलण्यास सक्षम आहे. त्यामुळे पुढील आठवड्यात सादर होणाऱ्या अर्थसंकल्पात विविध योजनांची घोषणा होईल. सगळीकडे हिरवळ असल्याचे त्या घोषणा ऐकून, वाचून पाहणाऱ्यांना, वाचणाऱ्यांना वाटेल. राज्यात डबल इंजिनचे सरकार आहे, केंद्राकडून सढळ हाताने राज्याला मदत होत आहे, असे सांगितले जाईल. मात्र राज्याला आर्थिक शिस्तीचीही गरज आहे. नुकतेच दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्रात ३० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करणारे सामंजस्य करार झाले. यातून ४० लाखांहून अधिक रोजगार निर्मितीची शक्यता वर्तवण्यात आली. करार झालेले सर्व उद्योग महाराष्ट्राच्या शहराशहरात उभे राहावेत, ही महाराष्ट्रातील सामान्य माणसाची सदिच्छा आहेच. पण गेल्या पाच वर्षात झालेल्या करारांपैकी किती गुंतवणूक जमिनीवर उतरली आणि किती उद्योग उभे राहिले याची आकडेवारी समोर येत नाही. स्वित्झर्लंडच्या बर्फाच्छादीत प्रदेशात महाराष्ट्रातीलच दुष्काळी भागातील, मंत्रालयापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या कंपनीसोबत करार झाल्याचीही टीका होते. हे विरोधकांचे कामच आहे, असे म्हणून हा वाद इथेच सोडून देऊ. करार झाले, उद्योग येणार हे महत्त्वाचे. मागील सरकारच्या कार्यकाळात राज्यातील उद्योग पळवल्याची चर्चा अधिक झाली, असे असूनही परकीय गुंतवणूकदारांची पहिली पसंती अजून हा मराठी प्रदेशच आहे. त्यामुळे अर्थसंकल्पात मुंबईला ग्रोथ हब बनवून अर्थव्यवस्था ३००-४०० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवण्याचे टार्गेट निश्चित केले जाऊ शकते. नवीन औद्योगिक धोरण, पायाभूत सुविधा, एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता यातून विकासाचे चक्र गतिमान केले जाण्याचा संकल्प होणार आहे. सेमीकंडक्टर, नूतनीकरणक्षम ऊर्जा, जैवतंत्रज्ञान, मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक वाढवली जाईल. शेती आणि शेतीवर आधारित उद्योगांसाठी त्यात नवीन तंत्रज्ञानाचा वापर यावरही अर्थसंकल्पात भर राहण्याची शक्यता आहे. दावोसमधून आलेल्या एकूण गुंतवणुकीपैकी सर्वाधिक गुंतवणूक ही एमएमआरडीएमध्ये आलेली आहे. यामुळे पायाभूत सुविधांवर सर्वाधिक खर्च अपेक्षित आहे. राज्याचा आर्थिक पसारा वाढलाच पाहिजे, त्याला कोणीही नाही म्हणणार नाही. मात्र एकीकडे अब्जावधी डॉलर्सचे स्वप्न पाहात असताना राज्याच्या तिजोरीत आज खडखडाट का? २०२५ पर्यंत राज्यातील शासकीय कंत्राटदारांची जवळपास ९० हजार कोटींची थकबाकी आहे. कामाचे पैसे मिळत नाहीत म्हणून कंत्राटदारांनी आत्महत्यादेखील केली. छोट्या-मोठ्या कंत्राटदारांनी आंदोलने केली, त्यानंतर सरकारने काही रक्कम देण्याचे मान्य केले, मात्र एकूण थकबाकीच्या फक्त १० टक्के रक्कम दिली गेली, ही 'ऊंट के मुंह में जीरा' अशी स्थिती. कंत्राटदारांना दिलेले थकबाकीच्या रकमेचे धनादेश बँक आणि ट्रेझरीमध्ये वटत नाहीत, पैसे नसल्याचे सांगितले जाते. ज्या राज्याचा देशात डंका आहे तिथे ही स्थिती का निर्माण झाली, याचेही गणित अर्थसंकल्पात मांडले गेले पाहिजे. शेतकऱ्यांनाही अर्थसंकल्पाकडून मोठ्या आशा आहेत. दोन दिवसांपूर्वीच अवकाळीने दणका दिला. पिकांना योग्य मूल्य मिळत नसल्याने तो आधीच संकटात आहे, त्याला खाईत लोटले जाणार नाही, याचीही काळजी घ्यावी लागेल. मंगळवारी सरकारने ११ हजार ९९५ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. यावरूनच सरकारचे आर्थिक नियोजन फसलेले असल्याचे दिसून येते. पुरवणी मागण्या करणे याचाच अर्थ सरकारचे आर्थिक नियोजन ढासळलेले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वजा केली तर राज्यातील इतर योजनांना निधी दिला जात नाही, अशी मंत्र्यांचीच ओरड ऐकायला येते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारच्या काळात सुरू झालेल्या अनेक योजनांवर गंडांतर आले आहे. लाडक्या बहिणींची संख्याही विविध अटींची अंमलबजावणी करून कमी केली जात आहे. आर्थिक बोजा वाढवणाऱ्या एखाद्या नस्तीवर विचारच केला जात नाही. अधिकाऱ्यांना आदेश आहेत की प्रस्तावित प्रकल्पांमध्ये दोष त्रुटी शोधा आणि नस्ती परत करा. जेवढा अधिक काळ निधी देण्यासाठी लागेल तेवढा वाढवा. हे खरे असेल तर गंभीर आहे. याचे कारण सरळ आहे, राज्याचे आर्थिक नियोजन बिघडले आहे. सर्वाधिक काळ उपमुख्यमंत्री आणि ११ वेळा अर्थसंकल्प सादर करणारे अर्थमंत्री अजित पवार आता नाहीत. राज्याला आर्थिक शिस्त लावण्याची गरज असल्याचे अजितदादा नेहमी म्हणायचे. आवश्यक त्या योजना, प्रकल्पांनाच निधी देणे हे नियोजन त्यांच्याकडून केले जात होते. विनाकारण होणाऱ्या खर्चाला आळा घालण्याची आता गरज आहे. लोकानुनयाच्या योजना आणण्यापेक्षा लोकोपयोगी योजना आणून त्यातून आर्थिक, सामाजिक प्रगती राज्याने साधली पाहिजे. फक्त लोकांनाच शिस्तीचे धडे देऊन चालणार नाही, तर सरकारचे मंत्री, सत्ताधारी आमदार आणि प्रशासनाने आर्थिक ताळेबंद बिघडणार नाही, हे लक्षात घेण्याची गरज आहे, हे सांगण्याची जबाबदारी आता राज्याचे प्रमुख मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्याच शिरावर आहे. मुंबई महापालिकेच्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार आगामी वर्षामध्ये तब्बल ४८ हजार कोटी रुपयांची भांडवली कामे केली जाणार आहेत. २०२१मध्ये ही कामे सरासरी साडेबारा हजार कोटींची होती. गेल्या पाच वर्षांत ती चौपटीने वाढली. भांडवली कामांमधून कायमस्वरूपी नागरी सुविधांचे निर्माण केले जाते, तर महसूल खचार्तून पगार, नैमित्तिक खर्च, दुरुस्ती व देखभाल हे खर्च होतात. गेल्या २५ वर्षांत मुंबईमध्ये दर वषार्ला दहा हजार कोटींची भांडवली कामे झाली असती तर पंचवीस वर्षांत अडीच लाख कोटींची कामे झाली असती. पण, गेल्या २५ वर्षांत मुंबईकरांना ही कामे 'अनुभवता' आलेली नाहीत. मुंबईतील पूर्व मागार्पासून ते कोस्टल रोड आणि मोनोरेलपासून ते मेट्रोपर्यंतचे सर्व प्रकल्प हे राज्य व केंद्र सरकारच्या निधीतून झाले. अडीच लाख कोटी रुपये खर्चूनही मुंबई इतकी बकाल का राहिली, हा प्रश्न या निमित्ताने विचारायला हवा. ऐंशी हजार कोटींच्या ठेवी ठेवण्याऐवजी तो निधी या शहरातील नागरिकांच्या आरोग्य, शिक्षण, वाहतूक, करमणूक या सुविधांवर खर्च झाला असता तर मुंबई हे एक 'स्वच्छ व सुंदर शहर' म्हणून लौकिकास आले असते, पण इच्छाशक्तीचा अभाव आणि सुविधा उभारण्याऐवजी खिसे भरण्याची वृत्ती यातून सत्ताधाऱ्यांनी मुंबईचे अतोनात नुकसान केले. त्यामुळे आता ठेवी मोडून भांडवली कामे केली जात असतील व त्यामुळे मुंबईकरांची जगण्याची रोजची लढाई सुसह्य होणार असेल तर त्याचे स्वागतच करायला हवे. त्याचबरोबर पालिकेचा कारभार आर्थिक शिस्तीमध्ये चालतो का, हे बघणारी हे सक्षम यंत्रणाही उभी केली पाहिजे. पालिका ही ठेवी करणारी यंत्रणा नाही, तसेच ती नेते किंवा अधिकाऱ्यांचे खिसे भरणारी यंत्रणा नाही, हे भान प्रशासन आणि राजकीय सत्ताधीश या दोघांनी ठेवले तर पुढील काही वर्षांत मुंबईचे चित्र बदलू शकते. त्यासाठी जबरदस्त इच्छाशक्ती व कडक शिस्त मात्र नक्की हवी.

## एपस्टीन फाईल्स अन्... युरोप व भारत

**एपस्टीन फाइल्सची सर्वत्र चर्चा आहे. युरोपमध्ये त्यामुळे काही जणांना राजीनामा देणे भाग पडले आहे. भारतातील काही व्यक्तींची नावेही चर्चेत आहेत. पण त्याबाबत पुढे काय होईल?**




युरोपच्या राजकारणात एपस्टीन फाइल्समुळे सध्या चांगलीच उलथापालथ सुरू आहे. इंग्लंडचे राजपुत्र अँड्र्यू यांना तर थेट अटकच झाली आहे. जेफ्री एपस्टीन हा अमेरिकी अर्थपुरवठादार आणि सेक्स ट्रॅफिकिंगचा दोषी ठरलेला गुन्हेगार होता, हे आता सर्वज्ञात आहे. त्याच्याविषयी आणि त्याच्या एपस्टीन फाइल्सविषयी खूप काही लिहून आले आहे, लिहून येते आहे. अमेरिकेच्या जस्टिस डिपार्टमेंटने लाखो पानांचे दस्तऐवज जारी केले आहेत, ज्यात ३० लाखहून अधिक पाने आणि हजारो फोटो, व्हिडीओ यांचा समावेश आहे. अँड्र्यू म्हणजे किंग चार्ल्स यांचे धाकटे भाऊ. त्यांचे एपस्टीनशी अनेक वर्षांपासून निकटचे संबंध होते. आपण अल्पवयीन असताना अँड्र्यू यांच्यासोबत शरीरसंबंधांसाठी एपस्टीनने आपल्यावर दबाव आणला, असा आरोप व्हर्जिनिया गिफ्रे या महिलेने केला होता. अँड्र्यू यांनी हे आरोप सातत्याने नाकारले. पण २०२२ मध्ये त्यांनी गिफ्रेसोबत १२-१५ दशलक्ष पौंडांची 'कायदेशीर तडजोड' केली. मुळात आधी आरोप नाकारणारे अँड्र्यू यांनी ही तडजोड केली, याचा अर्थ त्यांनी आरोप मान्य केले, असा होऊ शकतो. इंग्लंडमधील मजूर पक्षाचे माजी नेते, अमेरिकेतील ब्रिटिश राजदूत पिटर मँडेलसन यांना एपस्टीनशी संबंधित आरोपांवर फेब्रुवारी २०२६मध्ये अटक झाली. इंग्लंडचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी, अँड्र्यू यांनी अमेरिकी काँग्रेससमोर साक्ष द्यावी, अशी मागणी केली आहे. या घडामोडींमुळे एकूण ब्रिटिश राजेशाहीवरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नॉर्वेमधील क्राउन प्रिन्सेस मेटे-मारिट यांचे नाव एपस्टीन फाइल्समध्ये आले. त्यांनी २०१३मध्ये एपस्टीनच्या पाम बीचमधील घरात मुक्काम केला. सन २०१२मध्ये त्यांच्यात ई-मेल संदेशांची देवाणघेवाण झाली होती. फ्रान्स, जर्मनी आणि इतर देशांत एपस्टीनशी संबंधित व्यक्तींच्या नावांची चर्चा आहे. त्यामुळे राजकीय राजीनामे आणि तपासचक्र सुरू झाले. त्यातच बिल गेट्स यांचेही नाव आल्याने खळबळ माजली. एपस्टीन फाइल्समध्ये युरोपीय नेत्यांचीही नावे आहेत. यात अँड्र्यूसह पीटर मँडेलसन (यूके), एहुद बराक (इस्रायल), जॅक लँग (फ्रान्स) यांचा समावेश आहे.

एपस्टीन फाइल्समध्ये उद्योगपती बिल गेट्स यांचे नाव अनेकदा येते. गेट्स आणि एपस्टीन हे २०११पासून अनेकदा एकमेकांना भेटले. फोनवर बोलले. आमच्यात अनेकदा बोलणे झाले हे खरे, मात्र ते 'परोपकारी कामां'बद्दल होते, असा गेट्स यांचा दावा आहे. एपस्टीनने 'गेट्स फाउंडेशन'च्या काही कर्मचाऱ्यांना भेटायला बोलावले होते. मध्यंतरी काही नव्या फाइल्स बाहेर आल्या आहेत. त्यात एपस्टीनने स्वतःला पाठवलेल्या काही ई-मेल्सचा उल्लेख आहे. त्या मेल्समध्ये असा दावा केला होता, की बिल गेट्स यांनी रशियन महिलांशी शरीरसंबंध राखले. त्यातून त्यांना संसर्ग झाला. त्यासाठी त्यांनी प्रतिजैविके देखील घेतली. गेट्स यांनी ही प्रतिजैविके पत्नी मेलिंडा यांना देखील त्यांच्या नकळत देण्याचा प्रयत्न केला, असा एपस्टीनचा दावा आहे. गेट्स यांच्या प्रतिनिधीने मात्र हे दावे सपशेल फेटाळले आहेत. बिल गेट्स यांनी या संदर्भात नुकतीच कर्मचाऱ्यांसमोर माफी मागितली. एपस्टीनसोबत वेळ घालवणे ही माझी फार मोठी चूक होती, असे त्यांनी नमूद केले. छायाचित्रात आपल्यासोबत दिसणाऱ्या दोन रशियन महिलांपैकी एक ब्रिज खेळाडू, तर दुसरी न्युक्लिअर फिजिसिस्ट होती. मी काहीही गैर केले नाही, काही गैर पाहिले नाही असा दावा गेट्स यांनी केला आहे. बिल गेट्स यांच्यावर अद्याप कोणताही गुन्हा सिद्ध झालेला नाही किंवा ठोस आरोप नाहीत. फक्त एपस्टीन सोबतचे संबंध आणि पडताळणी न केलेले दावे आहेत.

भारतात देखील राजकारण, उद्योगजगत यांसह इतर काही क्षेत्रांतील खूप शक्तिशाली अशा काही जणांची नावे याबाबत चर्चेत आहेत. उद्योगपती अनिल अंबानी, पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी यांची नावे चर्चेत आहेत. राजस्थानच्या उपमुख्यमंत्री दिया कुमारी व त्यांच्या मुलावर या संदर्भात काँग्रेस नेते पवन खेरा यांनी आरोप केलेले आहेत. पवन खेरा यांनी जयपूरचे महाराजा सवाई पद्मनाभ सिंह यांच्या २०१८मधील वाढदिवसाच्या समारंभाशी एपस्टाइनशी संबंधित कागदपत्रांचा संबंध जोडणारी सोशल मीडिया पोस्ट शेअर केल्यानंतर एक नवीन राजकीय वाद निर्माण झाला आहे. जयपूरचे महाराजा म्हणजे राजस्थानच्या उपमुख्यमंत्री दिया कुमारी यांचे पुत्र सवाई पद्मनाभ सिंह. २०१८मध्ये रोममध्ये पद्मनाभ सिंह यांच्या विसाव्या वाढदिवसाच्या सोहळ्याचे यापूर्वी मोठ्या प्रमाणात वृत्तांकन झाले होते.

दीपक चोप्रा, मीरा नायर, नंदिता दास यांचीही नावे एपस्टीन फाइल्समध्ये कुठल्या ना कुठल्या कारणाने आल्यामुळे चर्चेत आहेत. २०१७-२०१९ दरम्यान एपस्टीन आणि अनिल अंबानी यांच्यातील अनेक मेसेज आणि ई-मेल सापडले, असा दावा केला जातो. यात दिल्लीतील नेतृत्वाच्या वतीने ट्रम्प प्रशासनातील जॅरेड कुश्नर, स्टिव्ह बॅनन यांच्याशी संपर्क साधण्याची विनंती आहे. केंद्रीय मंत्री हरदीप पुरी यांचा उल्लेख यात आहे. पुरी यांनीच अनिल अंबानी यांचा एपस्टीनशी परिचय करून दिला, असा आरोप विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे. तर, एपस्टीनला आपण तीन-चार वेळा भेटलो होतो; मात्र त्या भेटी पूर्णपणे व्यावसायिक होत्या आणि हवामान शिखर परिषदेच्या, तसेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या संदर्भात होत्या, असे पुरी यांनी म्हटले आहे.

इंग्लंडमध्ये व इतरत्र या प्रकरणी राजीनामे देणे सुरू असले तरी भारतात तसे काही होणे शक्य नाही. बोफोर्सपासून अगदी टू जी, कॉमनवेल्थ गेम्सपर्यंत सर्व प्रकारचे आरोप करून काँग्रेसच्या तत्कालीन सत्ताधाऱ्यांचे, मंत्र्यांचे राजीनामे मागणारा, घेणारा तेव्हाचा विरोधी पक्ष भारतीय जनता पक्ष आज सत्तेवर आहे. हा पक्ष स्वतःकडील कुणावर आरोप झाले तर त्याचा राजीनामा घेईल, असे वाटत नाही..

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण हे गेल्या काही दिवसांपासून सातत्याने दावा करीत होते, की एपस्टीन फाइल्समध्ये भारतातील काही आजी-माजी खासदारांची नावे आहेत आणि त्यामुळे देशाचा पंतप्रधान बदलू शकतो. त्यावर सर्वत्र मोठी चर्चाही झाली. आपल्या त्या दाव्यावर पृथ्वीराज चव्हाण आजही ठाम आहेत.

'सत्ता भ्रष्ट करते आणि पूर्ण शक्ती पूर्णपणे भ्रष्ट करते,' असे एकोणिसाव्या शतकातील ब्रिटिश इतिहासकार लॉर्ड अ ॅक्टन यांनी म्हटले होते. अधिकार नियंत्रित नसल्यामुळे नैतिक सचोटीचा ऱ्हास होतो. नेते अनेकदा स्वसंरक्षणासाठी सत्तेचा गैरवापर करतात, क्षमतेपेक्षा निष्ठेला प्राधान्य देतात आणि लोभाला बळी पडतात, असे हे सूत्र सांगते. आज एपस्टीन फाइल्सद्वारे ज्या घटना उघड केल्या जात आहेत त्या लॉर्ड अ ॅक्टन यांच्या विधानाशी सुसंगतच आहेत, असे दिसते.

या सगळ्या गदारोळात जगभर इतरत्र राजीनामे देण्याच्या घटना घडत आहेत. असे असले तरी भारतात जे सुरू आहे, त्याबाबत सर्वोच्च नेतृत्वाकडून काही स्पष्टीकरण, खुलासा येणे कठीण... नव्हे अशक्यच आहे. खरे तर राज्यकर्त्यांवर अशा प्रकरणांत काही आरोप होणे, हेच अयोग्य आहे. आणि असे आरोप झाले तर ज्यांच्यावर असे आरोप होत आहेत त्यांनी त्यांनी पत्रकारांकडे स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. पण पत्रकारांना खड्यासारखे दूर ठेवणाऱ्या सत्ताधारी भाजप नेत्यांना हे कोण सांगणार?

## मल्ल्याच्या प्रत्यार्पणाचा तिढा

भारतातील बँकांतील आर्थिक अनियमिततेमुळे देश सोडून गेलेला उद्योगपती विजय मल्ल्या पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. भारतात परतण्याविषयी मुंबई उच्च न्यायालयाने विचारणा केली असता, त्याने तेथील न्यायालयीन प्रक्रियेमुळे त्यास प्रतिबंध आहे, असे उत्तर दिले. एखादी व्यक्ती न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येत नसेल, तर तिला न्यायालयीन सवलती किंवा घटनात्मक संरक्षण मागण्याचा पूर्ण अधिकार मिळत नाही, असे भारतीय न्यायप्रक्रिया सांगते, तर एखादी व्यक्ती न्यायालयीन नियंत्रणाखाली असल्यास ती स्वतःच्या इच्छेने देश सोडू शकत नाही, असे ब्रिटिश न्यायप्रक्रिया सांगते. भारतीय दृष्टिकोनातून मल्ल्या फरारी आहे, तर ब्रिटिश दृष्टिकोनातून तो न्यायालयीन निर्बंधाखाली आहे. यामध्ये भारत आणि ब्रिटनमध्ये असलेल्या प्रत्यार्पण कराराचाही विचार व्हायला हवा. या करारानुसार मल्ल्या भारतात यायला हवा; परंतु त्याचे प्रत्यार्पण न्यायालयीन प्रक्रियेत अडकले आहे. भारताचे पुरावे तेथील न्यायालयानुसार पुरेसे असले, तरी मल्ल्याने तुरुंगांची दुरवस्था, आरोग्याच्या समस्या, राजकीय सूड, न्याय्य सुनावणीविषयी शंका येथपासून मानवाधिकारापर्यंतचे मुद्दे तेथील न्यायालयात नेऊन, शक्य तेवढे कालहरण करण्याचा प्रयत्न केला आहे. सध्या एका 'गोपनीय कायदेशीर बाबी'मुळे त्याचे प्रत्यार्पण प्रलंबित आहे. एका देशात गुन्हा करून दुसऱ्या देशात पळून गेलेल्या आरोपींवरील पुढील कारवाईचा रस्ता किती काट्याकुट्यांचा आहे हे यावरून लक्षात यावे. गुन्हा एका देशात आणि न्यायप्रक्रिया दुसऱ्या देशात असेल, तर 'अंतिम न्यायाधिकार' कोणाचा, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.


## स्वच्छ, शाश्वत ऊर्जास्रोत

संयुक्त राष्ट्रांनी ठरवलेली शाश्वत विकास उद्दिष्ट्ये पूर्ण करताना हवामान बदल आणि पर्यावरणाचे रक्षण करणे महत्त्वाचे आहे. यापैकी एक उद्दिष्ट म्हणजे सर्वांना स्वच्छ आणि स्वस्त ऊर्जा मिळावी. हे उद्दिष्ट साधल्यास इतर सर्व उद्दिष्ट्ये पूर्ण करणे सोपे होते. विकसित देश म्हणून गणले जाण्यासाठी दरडोई वार्षिक ऊजार्वापर हा एक महत्त्वाचा निकष आहे. या निकषावर भारत अजून खूप मागे आहे. त्यामुळे भारतासमोर ऊर्जेचा पुरवठा वाढवणे आणि तो पर्यावरणाला अनुकूल स्रोतांतून करणे, ही दुहेरी उद्दिष्ट्ये आहेत. सौर आणि पवन ऊर्जा हे स्वच्छ ऊर्जा स्रोत लवकर उभारता येतात, पण त्यांच्यात ऊर्जेच्या पुरवठ्यातील अनियमितता आणि मोठ्या जागेची गरज यांसारख्या मर्यादा आहेत. याउलट, अणुऊर्जा कमी कार्बन उत्सर्जन करते, कमी जमीन वापरते आणि वर्षभर मोठ्या प्रमाणात ऊर्जा पुरवू शकते. हा एक सिद्ध झालेला आणि भारतात विकसित झालेला ऊर्जा स्रोत आहे. १९५४ मध्ये अणुऊर्जा विभागाची स्थापना झाली आणि तेव्हापासून भारताने अणुतंत्रज्ञान विकसित करण्यावर भर दिला आहे.

अणुऊर्जा प्रकल्प केवळ दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षाच देत नाहीत, तर आरोग्य, अन्नसुरक्षा आणि इतर अनेक क्षेत्रांमध्येही मोठे सामाजिक फायदे देतात. अमेरिकेच्या मदतीने तारापूर येथे १९६९ मध्ये पहिले अणुऊर्जा केंद्र सुरू झाले. त्यानंतर कॅनेडियन हेवी वॉटर रिऍक्टर तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित केले गेले. सुरुवातीला कॅनडा आणि अमेरिकेने मदत केली, पण १९७४ च्या अणुचाचणीनंतर त्यांनी पाठिंबा काढून घेतला. तरीही, भारताने स्वतःच्या कौशल्यावर आधारित अणुइंधन उत्पादन आणि औद्योगिक क्षमता वाढवली. आता भारतात ७०० मेगावॉट क्षमतेच्या अणुभट्ट्या उभारल्या जात आहेत. फास्ट ब्रीडर रिऍक्टर तंत्रज्ञानही विकसित झाले आहे आणि ५०० मेगावॉट क्षमतेचे युनिट लवकरच कार्यान्वित होईल. रशियाच्या मदतीने १००० मेगावॉट क्षमतेचे दोन प्रेशराइज्ड वॉटर रिऍक्टर युनिट्सही उभारले जात आहेत. अणुऊर्जा विभागाने संशोधन, अभियांत्रिकी, बांधकाम आणि संचालन या सर्वच बाबतीत कौशल्य मिळवले आहे. ६५० हून अधिक अणुभट्टी वर्षांचा सुरक्षित आणि उच्च-क्षमतेचा अनुभव हे याचेच द्योतक आहे. अणुऊर्जा नियामक मंडळाच्या कडक नियमांमुळे आणि सुरक्षिततेच्या संस्कृतीमुळे हे शक्य झाले आहे.

केंद्र सरकारने अणुऊर्जा क्षमतेचा विस्तार करण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. भारतीय तंत्रज्ञांमध्ये अणुऊर्जा क्षेत्रातील गुंतागुंतीचे तंत्रज्ञान विकसित करण्याची क्षमता आहे. ते उच्च सुरक्षा मानके आणि आव्हानात्मक औद्योगिक प्रक्रिया हाताळण्यात पारंगत आहेत. अणुऊर्जा प्रकल्पातील सुरक्षितता म्हणजे किरणोत्सर्गापासून मनुष्य आणि पर्यावरणाचे संरक्षण. हे डिझाइनपासून ते प्रकल्पाच्या अखेरपर्यंत सर्व टप्प्यांवर जपले जाते. उपकरणांची विश्वासार्हता महत्त्वाची आहे, कारण ती संयंत्रांच्या कार्यकाळात सहज उपलब्ध नसतात आणि वीजनिर्मिती नसतानाही ती बंद पडू नयेत. उच्च किरणोत्सर्गी इंधनाच्या सुरक्षिततेसाठी, अणुभट्टीतून बाहेर काढल्यानंतरही, विश्वासार्ह शीतलक साधनांची गरज असते. अणुऊर्जा क्षेत्रातील नवीन कंपन्यांनी सिद्ध झालेले तंत्रज्ञान आणि प्रशिक्षित टीम्सवर लक्ष केंद्रित करावे. अणुऊर्जा विभागातील अनुभवी लोकांचे मार्गदर्शन त्यांना उपयुक्त ठरेल. १०० गिगावॉट वीज निर्मिती क्षमता गाठण्यासाठी अणुऊर्जा विभागाने या राष्ट्रीय सामर्थ्याला अधिक गती देणे आवश्यक आहे.

भारतासमोर ऊर्जेची वाढती मागणी पूर्ण करणे आणि त्याच वेळी पर्यावरणाचे रक्षण करणे, ही एक मोठी जबाबदारी आहे. संयुक्त राष्ट्रांनी ठरवलेली शाश्वत विकास उद्दिष्ट्ये याच दिशेने वाटचाल करतात. या उद्दिष्टांमध्ये स्वच्छ आणि परवडणारी ऊर्जा मिळवणे हे एक महत्त्वाचे लक्ष्य आहे. जर आपण हे लक्ष्य गाठले, तर इतर अनेक सामाजिक आणि पर्यावरणीय उद्दिष्ट्ये आपोआपच पूर्ण होऊ शकतात. विकसित देश म्हणून गणले जाण्यासाठी दरडोई वार्षिक ऊजार्वापर हा एक महत्त्वाचा निकष आहे. या निकषावर भारत अजूनही खूप मागे आहे, हे वास्तव स्वीकारायला हवे.



भारताने अणुऊर्जा क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. तारापूर येथे पहिले अणुऊर्जा केंद्र सुरू झाले. स्वदेशी तंत्रज्ञानाचा विकास झाला. आता ७०० मेगावॉट क्षमतेच्या अणुभट्ट्या उभारल्या जात आहेत. रशियाच्या मदतीनेही प्रकल्प सुरू आहेत.

त्यामुळे, भारताला एकाच वेळी दोन आघाड्यांवर लढावे लागत आहे: एक म्हणजे ऊर्जेचा पुरवठा वाढवणे आणि दुसरे म्हणजे हा पुरवठा पर्यावरणाला हानी न पोहोचवणाऱ्या स्रोतांतून करणे.

सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जा हे स्वच्छ ऊर्जेचे उत्तम स्रोत आहेत. त्यांची उभारणी तुलनेने लवकर करता येते. मात्र, या ऊर्जा स्रोतांच्या काही मोठ्या मर्यादा आहेत. ऊर्जेच्या पुरवठ्यात अनियमितता असू शकते, म्हणजे जेव्हा ऊन नसेल किंवा वारा नसेल, तेव्हा वीज निर्मिती थांबते. तसेच, मोठ्या प्रमाणात वीज निर्मितीसाठी खूप मोठ्या जमिनीची आवश्यकता असते. या समस्यांवर मात करण्यासाठी अणुऊर्जा एक चांगला पर्याय ठरू शकते. अणुऊर्जा प्रकल्पांमधून कार्बन उत्सर्जन जवळजवळ नसते. ते कमी जमीन वापरतात आणि वर्षभर मोठ्या 'लोड फॅक्टर'वर (load factor - वीज निर्मिती क्षमतेचा किती टक्के वापर होतो) ऊर्जा पुरवू शकतात. हा एक सिद्ध झालेला आणि भारतात विकसित झालेला ऊर्जा स्रोत आहे.

भारतात अणुऊर्जा क्षेत्राचा प्रवास १९५४ मध्ये अणुऊर्जा विभागाच्या स्थापनेपासून सुरू झाला. स्थापनेनंतर लगेचच, भारताने विकसित राष्ट्रांच्या बरोबरीने येण्यासाठी अणुतंत्रज्ञानाशी संबंधित सर्व घटक भारतातच विकसित करण्यावर भर दिला. यासाठी योग्य ती पावले उचलण्यात आली. गेल्या अनेक वर्षांपासून देशात अणुऊर्जा क्षेत्रात अत्यंत काळजीपूर्वक उभारलेली ही शक्तिस्थाने केवळ दीर्घकालीन ऊर्जासुरक्षेची हमीच देत नाहीत, तर आरोग्य, अन्नसुरक्षा आणि इतर अनेक क्षेत्रांमध्येही मोठे सामाजिक फायदे देतात.

भारतातील अणुऊर्जा प्रकल्पाचा पहिला टप्पा अमेरिकेच्या मदतीने सुरू झाला. १९६९ मध्ये महाराष्ट्रातील तारापूर येथे अमेरिकेच्या 'जनरल इलेक्ट्रिक कंपनी'ने पुरवलेल्या प्रत्येकी २०० मेगावॉट क्षमतेच्या दोन बॉयलिंग वॉटर रिऍक्टर युनिट्स असलेले पहिले अणुऊर्जा केंद्र कार्यान्वित झाले. याचा कार्यभार अणुऊर्जा विभागाने स्वीकारला. त्याच सुमारास, देशातील औद्योगिक क्षमतांचा विचार करून, स्वदेशीकरणाला सोयीस्कर ठरेल आणि भविष्यात प्रगत विकासाची शक्यता असलेल्या कॅनेडियन हेवी वॉटर रिऍक्टर तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला.

या कॅनेडियन तंत्रज्ञानावर आधारित, प्रत्येकी २२० मेगावॉट क्षमतेच्या पहिल्या दोन युनिट्सचे बांधकाम 'अ‍ॅटोमिक एनर्जी ऑफ कॅनडा लिमिटेड'च्या सहकार्याने करण्यात आले. विशेष म्हणजे, या युनिट्ससाठी आवश्यक असलेली काही महत्त्वाची उपकरणे भारतीय उद्योगांनीच तयार केली होती आणि त्यांचे बांधकाम, कार्यान्वयन आणि संचालन भारतीय तज्ज्ञांनीच केले होते. या प्रकल्पातील पहिल्या युनिटने १९७३ मध्ये व्यावसायिक वीज निर्मिती सुरू केली. मात्र, दुसरे युनिट पूर्ण होण्यापूर्वीच, भारताने १९७४ मध्ये केलेल्या पहिल्या अणुचाचणीनंतर कॅनडा आणि अमेरिकेने आपला पाठिंबा काढून घेतला.

त्यानंतर मात्र, भारतात अणुऊर्जा तंत्रज्ञानाशी संबंधित प्रत्येक घटकांमध्ये तोपर्यंत विकसित झालेल्या कौशल्यामुळेच अणुइंधन उत्पादन आणि स्थानिक औद्योगिक क्षमता वाढीस लागली. हा कार्यक्रम 'मेड इन इंडिया' या धर्तीवर प्रगत पीएचडब्ल्यूआर अणुभट्ट्यांसह यशस्वी झाला. आता देशात ७०० मेगावॉट क्षमतेच्या पीएचडब्ल्यूआर अणुभट्ट्यांची मालिका उभारली जात आहे. या कौशल्याचा विस्तार फास्ट ब्रीडर रिऍक्टर तंत्रज्ञानापर्यंत झाला आहे. यातील पहिले ५०० मेगावॉट क्षमतेचे युनिट कार्यान्वित करण्याच्या अंतिम टप्प्यात आहे.

याव्यतिरिक्त, रशियन फेडरेशनच्या सहकार्याने एक हजार मेगावॉट क्षमतेचे दोन प्रेशराइज्ड वॉटर रिऍक्टर युनिट्सदेखील उभारले जात आहेत. त्यांची बांधणी, वापर सज्जता आणि कार्यान्वयन भारतीय तज्ञांकडूनच केले जात आहे. सध्या अशा आणखी चार युनिट्सचे बांधकाम सुरू आहे. अणुऊर्जा विभागाने संशोधन आणि विकास, रचना, अभियांत्रिकी, बांधकाम आणि संचालन/कार्यान्वयन यांसारख्या विविध अणुऊर्जा तंत्रज्ञानामध्ये परिपक्वता मिळवलेली आहे. या परिपक्वतेमुळेच ६५० पेक्षा जास्त संचित अणुभट्टी वर्षांसाठी सुरक्षित आणि उच्च-क्षमतेचे संचालन शक्य झाले आहे. अणुऊर्जा नियामक मंडळाच्या प्रभावी नियामक पद्धती आणि कार्यरत संस्थांमधील मजबूत सुरक्षितता संस्कृतीचे हे उत्तम उदाहरण आहे.

वर्षानुवर्षे काळजीपूर्वक विकसित करण्यात आलेल्या आत्मनिर्भर अणुऊर्जा क्षमतेचा विस्तार आणि वृद्धी करण्यासाठी अतिरिक्त घटकांचा समावेश करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय अत्यंत स्वागतार्ह आहे. या गुंतागुंतीच्या तंत्रज्ञानाच्या विकासाच्या एका भागाशी असलेली माझी दीर्घकाळची बांधिलकी, नियामक कार्यपद्धतींशी असलेला संबंध आणि विविध प्रकारच्या उद्योगांशी संपर्क आणि इतर कौशल्यांचा अनुभव, यांमुळे अणुऊर्जा क्षेत्रात प्रवेश करणे हे भारतीय तंत्रज्ञांच्या आवाक्यात आहे, याची मला खात्री वाटते. उच्च क्षमतेची सुरक्षा आणि आवश्यक असलेल्या अशाच आव्हानात्मक औद्योगिक प्रक्रिया हाताळण्यात ते पारंगत आहेत, यात यत्किंचितही शंका नाही.

अणुऊर्जा क्षेत्रातील सुरक्षितता संस्कृती म्हणजे प्रकल्पाच्या परिसरातील सर्व लोक आणि पर्यावरण यांना आयनीकरण किरणोत्सर्गापासून अधिक संरक्षण मिळणे. या पैलूचा अंतर्भाव रचनेपासून बांधकाम, संचालन, कार्यान्वयन, देखभाल आणि सेवा समाप्तीपर्यंत सर्व टप्प्यांत काळजीपूर्वक करण्यात आला आहे. अणुऊर्जा प्रकल्पातील उपकरणे आणि प्रणाली यांची उच्च विश्वासार्हता सुनिश्चित करण्याची आवश्यकता दोन मुख्य पैलूंवर लक्ष केंद्रित करते. एक म्हणजे, एखादे विशिष्ट उपकरण त्या संयंत्रांच्या कार्यकाळात सोयीस्कर देखभाल किंवा दुरुस्तीसाठी सहज उपलब्ध नसणे आणि दुसरे असे, की ज्या वेळी हा प्रकल्प वीजनिर्मिती करत नसतो तेव्हाही तो ऑपरेटरसाठी कधीही बंद केला जात नाही, हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

ज्या इंधनामध्ये उच्च पातळीच्या किरणोत्सगार्ची क्षमता असते, त्याच्या सुरक्षिततेसाठी, ते सुरक्षितपणे अबाधित ठेवण्याकरिता, अगदी अणुभट्टीतून बाहेर काढल्यानंतरही, नेहमी विश्वासार्ह आणि अनेक प्रकारच्या शीतलक साधनांची आवश्यकता असते. अणुऊर्जा तंत्रज्ञानातील या अद्वितीय मापदंडाला अगदी सर्वोच्च पातळीवरील अधिकाऱ्यांपासून ते शेवटच्या कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वांनी उच्च दर्जाचे प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक असते. अणुऊर्जा क्षेत्रात अनेक जण पाऊल टाकत आहेत. नव्याने या क्षेत्रात येणाऱ्या या मंडळींसाठी प्रचलित सिद्ध झालेले तंत्रज्ञान अंगीकारणे आणि प्रशिक्षित रचना आणि कार्यान्वयन टीम बाळगणे श्रेयस्कर ठरेल. या नव्या सहभागींसाठी अणुऊर्जा विभागातील अनुभवी घटकांचे मार्गदर्शन सहज उपलब्ध होईल, ज्यामुळे त्यांना या तंत्रज्ञानासाठी आवश्यक असलेली क्षमता आणि कौशल्ये विकसित करता येतील, अशी अपेक्षा आहे. निर्धारित कालमयार्देत १०० गिगावॉट वीज निर्मिती क्षमता गाठण्यासाठी अणुऊर्जा विभागाने या राष्ट्रीय सामर्थ्याला द्विगुणित करण्याच्या प्रक्रियेला अधिक गती देणे आवश्यक आहे.

# तरुण दिसायचे आहे, मग तुमच्यासाठी खास टिप्स...

**सर्वच तरुणींना आपली त्वचा सुंदर असावी, आपण छान दिसावे असे वाटत असते. मात्र सर्वांनाच ते जमत नाही, कारण आपण जो फेस पॅकचा वापर करतो तो तितकीच त्वचा गोरी करतो. तुमच्या शरीराचा प्रत्येक भाग छान दिसण्यासाठी आम्ही तुम्हाला देत आहोत काही खास टिप्स, त्या पुढीलप्रमाणे :**



■ ज्या लोकांना कोणतीही ॲलर्जी असते अशा लोकांनी मध व दुधात स्नान करणे फायदेशीर असते. या स्नानामुळे त्वचेला अंतर्गत पोषण मिळते. ■ त्वच्या कोमल होण्यासाठी दूध आणि मध एकत्र मिक्स करून स्नान केल्यास त्वच्या कोमल राहते. दुधामधील प्रोटीन आणि फॅटचे प्रमाण त्वचेला आतून एक्सफोलिएट करण्याचे काम करते. याव्यतिरिक्त दुधातील लॅक्टिक ॲसिड मृत पेशींना दूर करण्याचे काम करते. त्यामुळे त्वचेवरील ड्रायनेस कमी होतो. ■ तसेच या स्नानामुळे तुम्ही लवकर वृद्ध होणार नाही त्यामुळे तुमची त्वचा तरुण दिसते. ■ मध आणि दूध एकत्रित घेतल्यास थेट नर्व्हस सिस्टमवर प्रभाव पडतो. दूध त्वचेला कोमल बनवते तर मध त्वचेला नवजीवन प्रदान करते. ■ अरोमासाठी सी सॉल्ट आणि लेव्हेंडर ऑइल वापरले जाते. तणाव दूर करण्यासाठी सुद्धा या मिश्रणाने स्नान केले जाते.

# धणे-हळदीच्या मिश्रणाने दूर करा पिंपल, ब्लॅकहेड्‌सची समस्या!

**चेहऱ्यावरचे** डाग, ॲक्ने, ब्लॅकहेड्‌सच्या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी तुम्ही ब्युटीपार्लरमध्ये काही ट्रीटमेंट्स घेतल्या असतील. पण काही घरगुती उपायांनी अगदी सुरक्षितरित्या तुम्ही या समस्येपासून सुटका मिळवू शकता. असाच एक उपाय म्हणजे 'धणे'!

**फायदेशीर उपाय -** धण्याचं (कोथिंबीरीच्या बिया) पाणी आणि हळद एकत्र करून चेहऱ्याला लावावे. यामधील ॲन्टीबॅक्टेरियल गुणधर्म त्वचेवर पिंपल्सची निर्मिती करणाऱ्या बॅक्टेरियांचा नाश करतात. कोथिंबीरीमध्ये 86.3% मॉईश्चर असते. यामुळे त्वचा रिहायड्रेट होण्यास मदत होते. यामुळे चेहऱ्यावरील डाग कमी होण्यास मदत होते. हळद आणि कोथिंबीर या दोन्हींमध्ये ॲन्टीऑक्सिडंट्स आणि व्हिटामिन्सचा मुबलक साठा असल्याने त्वचेचा पोत सुधारण्यासाठी मदत होते.





**साहित्य-**

▮ दोन चमचे धणे ▮ चमचाभर हळद ▮ ग्लासभर पाणी

**कसे बनवाल मिश्रण**

▮ ग्लासभर पाण्यात धण्याचे दाणे टाकून पाणी उकळा. पाण्याचा रंग बदलल्यानंतर गॅस बंद करा. मिश्रण थंड झाल्यानंतर पाणी गाळून घ्या. ▮ या पाण्यात थोडी हळद मिसळून पेस्ट बनवा. मात्र अतिप्रमाणात हळद वापरू नका, अन्यथा चेहरा पिवळा होईल. ▮ रात्री हे मिश्रण चेहऱ्याला लावा आणि सकाळी चेहरा स्वच्छ धुवा. ▮ सतत तीन-चार रात्री हा प्रयोग केल्यास तुमच्या चेहऱ्यावरील डाग, ॲक्ने कमी होण्यास मदत होईल.

# म्हातारपणात सर्वात जास्त होतात हे ३ आजार, ५० वर्षांचे झाले असाल तर सावध व्हा

म्हातारपणात मनुष्याला काही आजारपण जास्त त्रास देतात. हे आजार म्हातारपणाचे दुखणे अधिक वाढवतात. एक्सपर्टचे म्हणणे आहे की, वाढत्या वयात मनुष्याच्या शरीराची प्रतिरोधक क्षमता कमी होऊ लागते आणि त्याला बरेच आजार होऊ लागतात. पण काही असे आजार आहे जे ५० वर्षांहून जास्त वयाच्या महिला आणि पुरुषांना सर्वात जास्त होतात. तर जाणून घेऊ कोणते गंभीर आजार आहेत जे ५० वर्षांनंतर जास्त होतात.

**हृदयरोग**

सेंटर्स ऑफ डिसिज कंट्रोल अँड प्रीव्हेंशनचे म्हणणे आहे की, अमेरिकेत हृदयरोग पहिल्या क्रमांकावर आहे, जो म्हाताऱ्यांमध्ये जास्त दिसून येतो. ५० वर्षे पूर्ण केल्यानंतर हा आजार वाढू लागतो. भारतीय म्हाताऱ्यांमध्ये हा आजार जास्त प्रमाणात आढळून आला आहे.

**कर्करोग**

सेंटर फॉर डिसिज कंट्रोलचे म्हणणे आहे की, हार्ट ॲटॅकनंतर दुसऱ्या क्रमांकावर म्हाताऱ्यांमध्ये होणारे आजार म्हणजे कर्करोग. अमेरिकेत हार्ट ॲटॅकनंतर दुसऱ्या क्रमांकावर सर्वात जास्त मृत्यू कर्करोगामुळे होते. ५० वर्षांनंतर पुरुषांमध्ये लंग कर्करोगाचा धोका वाढू लागतो. तसेच महिलांमध्ये या वयात सर्वात जास्त स्तन कर्करोगाची लक्षणे दिसू लागतात. फुफ्फुस आणि स्तन कर्करोगानंतर पोटाचा आणि प्रोटेस्टेट कर्करोगाचा धोका वाढू लागतो.

**स्ट्रोक**

स्ट्रोक मस्तिष्क संबंधी आजारांमध्ये सर्वात सामान्य आजार आहेत. अमेरिकेत हार्ट ॲटॅक आणि कर्करोगानंतर सर्वात जास्त रुग्णांचा मृत्यू या आजारामुळे होतो. हे आजार सर्वात जास्त म्हाताऱ्या लोकांना प्रभावित करतात.





# छोले सॅलड

**साहित्य :** २०० ग्रॅम छोले (७-८ तास भिजवून उकडून घेतलेले), १ कांदा बारीक चिरलेला, २ चेरी टोमॅटो बारीक चिरलेले, वरून भुरभुरण्यासाठी पार्सली, २ चमचे ऑलिव्ह ऑइल, २ चमचे बारीक चिरलेली लसूण, १ चमचा चिली फ्लेक्स, २-३ चमचे लिंबाचा रस, मीठ, मिरपूड.

**कृती:** एका वाडग्यामध्ये लसूण, ऑलिव्ह ऑइल, मीठ मिरपूड, चिली फ्लेक्स आणि लिंबाचा रस एकत्र ढवळून घ्या. उकडलेल्या छोल्यांमध्ये ते मिसळा. आता यात कांदा, टोमॅटो घालून घ्या. नीट मिसळून थंड करायला ठेवा. वरून पार्सली भुरभुरा. छोले चाट आपण नेहमीच करतो पण हे आणखी थोडं वेगळ्या चवीचं सॅलड. यामध्ये छोल्यांऐवजी राजमाही वापरता येईल. पॅन टॉस करून पास्ताही त्यात मिसळता येईल.



# आरोग्यासाठी सर्व काही

**स्त्रीचे** आरोग्य म्हणजे फक्त गर्भारपण व बाळंतपणाच्या वेळचे आरोग्य नव्हे. खरे म्हणजे त्या वेळचे आरोग्य जर सर्व दृष्टीने सुदृढ राखावयाचे असेल तर त्याची काळजी तिच्या जन्मापासूनच घेतली पाहिजे. सुदृढ स्त्रीच सुदृढ आणि कार्यक्षम माता होऊ शकते. म्हणूनच स्त्रीच्या आरोग्याची काळजी व त्यासाठी लागणाऱ्या सुविधा तिला जन्मापासून मिळाल्या पाहिजेत. आयुष्याच्या सर्व टप्प्यांत सुदृढ असलेली स्त्री स्वतः तर स्वावलंबी बनेलच, पण समाजविकासाच्या कार्यालाही हातभार लावील. म्हणून सर्वांनी एकत्र येऊन स्त्रियांना स्वतंत्र, सुदृढ व संपूर्ण जीवन जगण्यास शिकवले पाहिजे. केवळ होणाऱ्या अन्यायासाठी एकत्र न येता आपले आरोग्य उत्तम राहण्यासाठीसुद्धा स्त्रियांनी एकत्र यायला हवे.

# ॲक्ने, ब्लॅकहेडचा त्रास दूर करण्यासाठी कसा कराल मुलतानी मातीचा वापर

**त्वचेच्या समस्या कमी करण्यासाठी पूर्वीपासून मुलतानी मातीचा वापर केला जातो. या आयुर्वेदिक उपायामुळे ॲक्ने, कळवंडलेली त्वचा, सनटॅन कमी करण्यास मदत होते. मात्र आजकाल कॉस्मेटिक क्रीम्स आणि उपाचारांचा वापर अधिक केला जातो. मात्र त्याचा काही दुष्परिणाम त्वचेवर होऊ शकतो. म्हणूनच हा धोका टाळण्यासाठी मुलतानी माती हा सुरक्षित आणि नैसर्गिक उपाय वापरणे अधिक फायदेशीर आहे.**



**कशी ठरते मुलतानी माती फायदेशीर?**

▮ मुलतानी मातीमध्ये मॅग्नेशियम क्लोराईडचे प्रमाण आढळते. यामुळे ॲक्नेचा त्रास कमी होण्यास मदत होते.

▮ तेलकट त्वचेवर मुलतानी मातीचा वापर केल्यास अतिरिक्त तेल आणि त्वचेचा तेलकटपणा कमी होतो. तसेच पुन्हा पिंपल येण्याचे प्रमाण कमी होते.

▮ चेहऱ्यावर मुलतानी मातीचा फेसपॅक लावल्याने त्वचेवरील मळ कमी होतो. तसेच तेल आणि मृतपेशींचा थर कमी होतो.

▮ मुलतानी मातीमुळे त्वचेवर थंडावा निर्माण होतो. त्यामुळे डाग, लालसरपणा कमी होतो.

▮ उन्हात फिरल्याने होणारे सनटॅन, पिंगमेंटेशनचा त्रास कमी होण्यास मदत होते.

▮ व्हाईटहेड्‌स, ब्लॅकहेड्‌सचा त्रास कमी होण्यासाठी मुलतानी माती फायदेशीर ठरते.

▮ चांगल्या आयुर्वेदिक भंडार / दुकानामधून घेतलेल्या मुलतानी मातीचा त्वचेवर मुळीच दुष्परिणाम होत नाही.

## त्वचेच्या प्रकार ओळखून त्यानुसार कसे कराल मुलतानी मातीचे फेसपॅक

**तेलकट त्वचेसाठी**

तुमची त्वचा तेलकट असल्यास योग्य फेसवॉशची निवड करून चेहरा नियमित धुवा. तसेच मुलतानी मातीचा फेसपॅक बनवताना त्यामध्ये गुलाबपाणी आणि चिमूटभर हळद मिसळा. हा पॅक चेहऱ्यावर आणि मानेवर पातळ थराच्या उंचीचा लावा. हा नैसर्गिकरीत्या सुकू द्या. त्यानंतर पाण्याने स्वच्छ धुवा. हा पॅक लावल्यानंतर चेहऱ्याची फार हालचाल करू नका. बोलू नका.

**सामान्य त्वचेसाठी**

■ सामान्य त्वचेवर मुलतानी मातीचा वापर करताना मुलतानी मातीची पेस्ट गुलाबपाण्याऐवजी दुधात बनवावी.

■ ॲक्नेचा त्रास कमी करण्यासाठी मुलतानी मातीचा वापर करत असल्यास मुलतानी मातीसोबत कडुलिंब, कापूर आणि गुलाबपाण्याचा वापर करा. हा पॅक चेहऱ्यावर आठवड्यातून एकदा लावावा.

■ पिंपल्सचे डाग, खुणा कमी करण्यासाठी मुलतानी माती वापरत असल्यास त्यामध्ये टोमॅटोचा रस मिसळा. सोबतच चंदन, हळदीचा या फेसपॅकमध्ये समावेश करू शकता.


■ चेहऱ्यावर काळे डाग असल्यास मुलतानी मातीमध्ये दही, पुदिन्याची पानं याची पेस्ट मिसळून तयार पॅक चेहऱ्यावर डाग असलेल्या जागी लावावा. अर्धा तासानंतर हा पॅक कोमट पाण्याने स्वच्छ धुवावा.

■ चेहऱ्यावरील त्वचेच्या समस्या कमी करण्यासाठी तुम्ही मुलतानी मातीसोबत काही इसेन्शिअल ऑईल मिसळू शकता.



# सकाळी रिकाम्या पोटी स्प्राउटेड चणे खा आणि रोग टाळा

**सकाळी :** सकाळी रिकाम्या पोटी स्प्राउटेड चणे खाणे खूप फायदेशीर आहे, यामुळे शरीर स्वस्थ राहते आणि रोग जवळपास देखील येत नाही. स्प्राउटेड चणे संपूर्ण किंवा वाटून साखर आणि पाण्यासोबत खाल्ल्याने शरीरातील प्रोटीनचे प्रमाण कायम राहते. तसेच स्नायू देखील मजबूत होतात. कोणत्याही स्वरूपात स्प्राउटेड चणे वापरणे फायदेशीर आहे. हे सलाड म्हणून देखील वापरले जातात. यामध्ये प्रोटीन, विटामिन आणि फायबरचे असलेले प्रमाण तणाव दूर करण्यास मदत करते.



## स्प्राउटेड चणे वापरण्याचे ८ फायदे

▮ चण्यामध्ये फायबरची मात्रा जास्त राहते. भिजवून खाल्ल्याने पोट किंवा कब्जा संबंधी समस्या टाळता येते.

▮ मूत्र समस्या असल्यास किंवा पुन्हा पुन्हा मूत्र येत असेल तर चणा अत्यंत फायदेशीर आहे.

▮ रिकाम्या पोटी चणे खाण्याने शरीरात अतिरिक्त प्रमाणात ग्लुकोज बनत नाही. मधुमेह देखील नियंत्रणात राहतो.

▮ मानसिक तणाव असलेल्या लोकांसाठी चणा खूप फायदेशीर आहे.

▮ सकाळी वाटलेल्या चण्यासोबत साखर किंवा पाणी मिसळून प्यायल्याने मानसिक तणाव दूर होतो.

▮ कावीळ असलेल्या रुग्णांनी नियमितपणे चणे खावे. हे बरेच फायदेशीर असतात.

▮ स्प्राउटेड चणे हिरव्या मुगासोबत खाल्ल्याने खाण्याने प्रोटिनची मात्रा वाढते.

▮ याच्या नियमित सेवनाने थकवा दूर होण्यास मदत मिळते.



# नाचता नाचता व्यायाम!

**झुंबा या प्रकारात एकामागोमाग एक गाणी लावून त्यावर ठरावीक पद्धतीने बसवलेल्या नृत्यासारख्या स्टेप्स केल्या जातात. एरोबिक्स, बॉलीवूड डान्स आणि झुंबा..सध्या हे व्यायाम प्रकार प्रचंड लोकप्रिय आहेत. ३१ डिसेंबरला आणि नववर्षात छान 'फिट' दिसायचे 'लक्ष्य' ठेवून तरुणांबरोबर मध्यमवयीन वर्गही 'जिम'कडे वळतो आहे. मुळात नाचता नाचता व्यायाम होऊन जाणार ही संकल्पनाच आकर्षक आणि मजेशीर वाटावी अशी आहे. या व्यायाम प्रकारांनी शरीराला नेमका कसा व्यायाम होतो ते जाणून घेऊया एरोबिक्स ट्रेनर डॉ. पलक कुलकर्णी यांच्याकडून..**

**एरोबिक्स**

सत्तरच्या दशकातच परदेशात एरोबिक्स लोकप्रिय होऊ लागले होते. त्यानंतर लोकांनी त्यांच्या व्यायामाच्या गरजेनुसार इतर प्रकार शोधून काढायला सुरुवात केली. 'झुंबा'ची सांगितली जाणारी जन्मकथाही मजेशीर आहे. ज्या व्यक्तीने हा झुंबा शोधला तेही एरोबिक्स ट्रेनर होते. एका दिवशी त्यांची एरोबिक्सची सीडी विसरली आणि लॅटिन प्रकारच्या डान्स सीडीवरून व्यायाम प्रकार घेतले गेले आणि त्यातून झुंबा आला असं म्हटलं जातं. पण झुंबा असो की बॉलीवूड डान्स. सगळ्याचा पाया एरोबिक्स हाच! एरोबिक्स म्हटलं म्हणजे तालबद्ध कवायत डोळ्यासमोर येते. पण उगीचंच कशाही उड्या मारणे किंवा इकडे-तिकडे वळून व्यायाम करणे म्हणजे एरोबिक्स नव्हे. हा प्रकार खूप व्यवस्थित आणि विचारपूर्वक ठरवलेल्या 'स्टेप्स'वर करायचा असतो. रोज तेच तेच करायचा कंटाळा येऊ नये म्हणून सतत वेगवेगळ्या 'कॉम्बिनेशन्स'मध्ये हालचाली केल्या जातात. त्यामुळे आज एरोबिक्समध्ये नवीन काय करणार याची उत्सुकता टिकून राहते. एरोबिक्समध्ये 'फ्लोअर एरोबिक्स' व 'बेंच एरोबिक्स' असे दोन प्रकार आहेत. फ्लोअर एरोबिक्समध्ये सुरुवातीला 'वॉर्मअप' व्यायाम करावे लागतात. यातही नुसते कसेही हात-पाय हलवून चालत नाही. वॉर्मअपच्याही ठरलेल्या स्टेप्स असतात. त्यालाच जोडून ३० ते ४० मिनिटे पोटावरील स्नायूंना (ॲब्ज) तसेच कमरेखालच्या व वरच्या शरीराला व्यायाम दिला जातो. एरोबिक्समध्येसुद्धा बॉलीवूड डान्सच्या काही स्टेप्स करता येतात. ते करताना लोकांना मजा येते. व्यायामाची क्षमता म्हणजे 'स्टॅमिना' कमी असणाऱ्यांना या प्रकाराने सुरुवात करता येईल. जे लोक खूप वर्षांपासून एरोबिक्स करत आहेत त्यांना मात्र बेंच एरोबिक्स हा प्रकार अधिक आवडतो असं दिसून येतं. यातही वॉर्मअप असतोच. पण प्रत्यक्ष व्यायाम 'बेंच'वर म्हणजे ठरावीक उंचीच्या मोड्यांवर साधारण ३० मिनिटांसाठी असतो. कमरेखालचे आणि वरचे शरीर व हृदय यांच्यासाठी हा चांगला व्यायाम आहे. यात बेंचच्या स्टेप्स चढणे व उतरण्यात पायांचाही खूप वापर होतो.

## झुंबा आणि बॉलीवूड डान्स

झुंबा या प्रकारात एकामागोमाग एक गाणी लावून त्यावर ठरावीक पद्धतीने बसवलेल्या नृत्यासारख्या स्टेप्स केल्या जातात. यातली संगीत व गाणी ठरलेली असतात. संगीत हेच झुंबाच्या आकर्षणाचे केंद्र आहे. संगीताच्या तालावर पाय आपसूक थिरकायला लागतात आणि नाचायचा हुरूप येतो. ७-८ वर्षांपूर्वीपासून झुंबा आपल्याकडे आला आणि हळूहळू लोकप्रियही होऊ लागला. बॉलीवूड डान्समध्येही वॉर्मअप चुकत नाही. पुढची ३० ते ४० मिनिटे व्यायाम करायचा असल्याने तो गरजेचा असतो. यात रोज हिंदी चित्रपटातील वेगळे गाणे घेऊन त्यावर शरीराला व्यायाम होईल, अशा प्रकारे नाचाच्या स्टेप्स बसवल्या जातात. यातला कोणताही नाच शिकणे व करणे अवघड नसते हे महत्त्वाचे.

गटाने करायच्या व्यायामात अनेकांना नवे मित्र भेटतात हे देखील व्यायाम लोकप्रिय होण्यामागचे कारण असू शकेल. एकट्यानेच चालायला किंवा पळायला जाणे किंवा एकट्यानेच जिममध्ये जाऊन व्यायाम करणे अनेकांना कंटाळवाणे वाटते आणि थोड्या दिवसांनी 'जिम'चा उत्साहसुद्धा कमी कमी होत जातो. याउलट संगीताच्या तालावर नाचण्याचा कंटाळा येत नाही, शिवाय बरोबरीच्या गटातले सगळेच नाचत असतात. त्यामुळे नव्याने आलेल्या व्यक्तीचा उत्साह टिकतो.

# टेम्पर्ड ग्लास असूनही का खराब होते मोबाइल स्क्रीन

**फोनच्या स्क्रीनला संरक्षण देण्यासाठी तुम्ही देखील टेम्पर्ड ग्लास वापरत असाल. बऱ्याच प्रसंगी हे टेम्पर्ड ग्लासेस फक्त फोन स्क्रॅचपासून वाचवू शकतात. पण, गार्ड डिस्प्ले क्रॅक होण्यापासून वाचवू शकत नाहीत.**

**स्मार्टफोनला** कोणत्याही प्रकारचे नुकसान पोहचू नये आणि संरक्षणाचा अतिरिक्त स्तर देण्यासाठी युजर्स स्क्रीन गार्ड वापरतात. बाजारात अनेक प्रकारचे स्क्रीन गार्ड उपलब्ध आहेत. काही लोक त्यांना टेम्पर्ड ग्लास असेही म्हणतात. तुम्ही रस्त्याच्या कडेला असलेल्या विक्रेत्याकडून स्क्रीन गार्ड विकत घेतल्यास ते जवळपास १०० रुपयांमध्ये सुद्धा मिळेल. काहींना तर, तर ५० रुपयांतही मिळू शकतात. स्मार्टफोनच्या मॉडेलनुसार त्याची किंमत अनेक वेळा वाढते. दुसरीकडे, जर तुम्ही ऑनलाइन गेलात, तर तुम्हाला हे स्क्रीन गार्ड १०० रुपयांपासून ते १००० रुपयांपर्यंतच्या किमतीत मिळतात. स्क्रीन गार्डसाठी इतक्या किमती का? असा प्रश्न तुम्हालाही पडत असेल.



**स्क्रीन का तुटते ?**

तुम्हाला फोनची स्क्रीन स्क्रॅचपासून वाचवायची असेल, तर हे स्वस्त गार्ड हे काम अगदी सहज करू शकतात. परंतु, काही वेळा ते स्क्रीन तुटण्याचे कारणही बनते. डिस्प्लेवर जाड स्क्रीन गार्ड लावल्यानंतर स्क्रीन आणि कव्हरमधील अंतर संपते. यामुळे, तुमचा फोन पडताच, त्याचा परिणाम डिस्प्लेवर पडतो, जो स्क्रीन गार्ड नसेल तर, कमी होऊ शकते.

टेम्पर्ड ग्लास ऑनलाइन शोधल्यास तुम्हाला १०० रुपयांपासून ते २००० रुपयांपेक्षा अधिक किमतीचे गार्ड उपलब्ध असल्याचे दिसून येईल. महत्त्वाचे म्हणजे या टेम्पर्ड ग्लासची किंमत बाजाराच्या तुलनेत खूपच कमी आहे.

**महागड्या स्क्रीन गार्डमध्ये काय खास आहे?**

बाजारात उपलब्ध असलेले स्वस्त टेम्पर्ड ग्लास किंवा स्क्रीन प्रोटेक्टर तुमच्या फोनच्या स्क्रीनला स्क्रॅचपासून वाचवू शकतात. पण तुमचा फोन पडला तर हे गार्ड त्यांना सुरक्षित करू शकत नाहीत. स्मार्टफोनची स्क्रीन तुटली नाही तर नशीबच. दुसरीकडे २००० रुपये खर्चून येणारे स्क्रीन प्रोटेक्टर तुमच्या स्क्रीनचे संरक्षण करू शकतात. हे गार्ड तयार करताना उत्तम तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यांना अशा पद्धतीने बनवण्यात येते की, पडदा पडल्यावर स्क्रीनवर थेट दाब येत नाही. त्याचबरोबर यामध्ये वापरण्यात आलेली काच देखील सामान्यपेक्षा खूपच वेगळी असते आणि हेच त्यांची किंमत जास्त असण्याचे कारण असते.

# असे बनवा लोणचे, तर वाढेल चव आणि रंगत...

**कैरीचे लोणचे, लिंबाचे लोणचे, मिरचीचे लोणचे, व्हेज लोणचे, अनेक प्रकाराचे लोणचे घरी अगदी आरामात तयार केले जातात. पण हेच लोणचे अधिक चविष्ट बनवण्यासाठी काही सोप्या टिप्स. याने लोणचाच्या रंगही आकर्षक दिसेल.**

▮ रंग आणि चव हे दोन्ही वाढवण्यासाठी लोणच्याचा तेलात गरम न करता मोहरीचे तेल घालायला हवं ▮ गोड आंब्याच्या लोणच्यात साखर मिसळून गॅसवर शिजवावे. ▮ चविष्ट लोणचे बनवण्यासाठी कुटलेली नव्हे तर अख्खी मोहरी वापरायला हवी.



# महाराष्ट्रात २०२५ मध्ये ४१ वाघांचा मृत्यू

## अनेक वाघांचा मृत्यू नैसर्गिक कारणाने, वनमंत्री गणेश नाईक यांची विधानसभेत माहिती

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

महाराष्ट्रात २०२५ मध्ये एकूण ४१ वाघांचा मृत्यू झाला. त्यापैकी बहुतेक वाघ नैसर्गिक कारणांमुळे मृत्युमुखी पडले, अशी माहिती राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी बुधवारी विधानसभेत दिली. अपघात, वीज पडणे आणि शिकार यामुळे वाघांचे मृत्यू रोखण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे, असे राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले.

मंत्र्यांनी दिलेल्या आकडेवारीनुसार, ४१ वाघांच्या मृत्यूपैकी २८ वाघांचा मृत्यू नैसर्गिक कारणांमुळे, आठ जणांचा अपघातांमुळे, चार विजेच्या धक्क्याने आणि एकाचा शिकारीमुळे झाला आहे.



मंत्र्यांनी बल्लारशाह-गोंदिया रेल्वे मार्गाच्या असुरक्षिततेवर प्रकाश टाकला हा मार्ग राज्यातील ताडोबा-अंधारी आणि नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पांच्या अनेक वन विभागांमधून आणि संवेदनशील बफर झोनमधून जातो. आकडेवारीवरून असे दिसून येते की, २०११ ते २०२५ दरम्यान या विशिष्ट रेल्वे मार्गावर पाच वाघांनी जीव गमावला आहे, असे ते म्हणाले.

रेल्वे अपघातांमध्ये वन्य प्राण्यांचे मृत्यू रोखण्यासाठी, चंद्रपूरचे मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी विशिष्ट सुरक्षा उपाययोजना राबविण्यासाठी रेल्वे विभागाशी औपचारिकपणे संपर्क साधला आहे, असे नाईक यांनी त्यांच्या उत्तरात म्हटले आहे. प्रस्तावित उपाययोजनांमध्ये प्राण्यांची सुरक्षित हालचाल करण्यासाठी नव्याने प्रस्तावित रेल्वे मार्गावर अंडरपास आणि ओव्हरपास बांधणे; संवेदनशील वनक्षेत्रातून जाणाऱ्या गाड्यांसाठी ताशी ४० किमी वेग मयार्दा लागू करणे; आणि प्राणी रुळांवर आकर्षित होऊ नयेत यासाठी रेल्वे प्रवाशांकडून होणाऱ्या अन्न कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे यांचा समावेश आहे.

**वन्य प्राण्यांचे मृत्यू रोखण्यासाठी...**

रेल्वे अपघातांमध्ये वन्य प्राण्यांचे मृत्यू रोखण्यासाठी, चंद्रपूरचे मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी विशिष्ट सुरक्षा उपाययोजना राबविण्यासाठी रेल्वे विभागाशी औपचारिकपणे संपर्क साधला आहे, असे नाईक यांनी म्हटले आहे. प्रस्तावित उपाययोजनांमध्ये प्राणी रुळांवर आकर्षित होऊ नयेत यासाठी रेल्वे प्रवाशांकडून होणाऱ्या अन्न कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे यांचा समावेश आहे, असे मंत्री म्हणाले.

प्रभावी संवर्धन प्रयत्नांमुळे वन्यजीवांच्या संख्येत वाढ झाली आहे, असे नाईक यांनी नमूद केले. तथापि, हे यश स्थलांतराचे आव्हान आणते कारण प्राणी नवीन अधिवास शोधतात, ज्यामुळे अनेकदा मानव-वन्यजीव संघर्ष होतो.

हे व्यवस्थापित करण्यासाठी, सरकारने रॅपिड रेस्क्यू युनिट्स, टायगर सेल आणि एलिफंट ट्रॅकिंग टीमसाठी कंत्राटी पद्धतीने ३६८ कर्मचाऱ्यांची भरती करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाला सादर केला आहे. लेखी उत्तरात राज्यातील वाघांच्या संरक्षणासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या उच्च-तंत्रज्ञानाच्या उपाययोजनांची देखील तपशीलवार माहिती देण्यात आली आहे.

मंत्र्यांनी सांगितले की, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी क्षेत्रीय कर्मचारी एम-स्ट्राइप्स मोबाईल-आधारित देखरेख प्रणालीचा वापर करत आहेत. नागपुरात एक समर्पित वन्यजीव गुन्हे कक्ष बळकट करण्यात आला आहे. मेळघाटमध्ये एक सायबर सेल शिकारींचा माग काढण्यासाठी डिजिटल फूटप्रिंट्सचा वापर करत आहे.

विशेष व्याघ्र संरक्षण दल (एसटीपीएफ), श्वान पथके तैनात करणे आणि पाण्याच्या विहिरीजवळ लोखंडी सापळे शोधण्यासाठी मेटल डिटेक्टरचा वापर करण्याचा विचार केला जात आहे, असे नाईक म्हणाले.

मंत्र्यांनी सभागृहाला आश्वासन दिले की संरक्षण धोरणे सुधारण्यासाठी जिल्हास्तरीय व्याघ्र समित्या नियमितपणे बैठका घेत आहेत आणि रेंज स्तरावर माहिती देणाऱ्यांचे जाळे राखण्यासाठी 'गुप्त सेवा निधी' वापरला जात आहे.

# कोकणात जाणाऱ्या प्रवाशांना दिलासा

## होळी सणासाठी मध्य रेल्वेच्या २० अतिरिक्त विशेष गाड्या

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या होळी सणानिमित्त कोकणात जाणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी मध्य रेल्वेने २० अतिरिक्त विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. एलटीटी - मडगाव - एलटीटी साप्ताहिक विशेष गाडीच्या ४ सेवा आणि दिवा-चिपळूण-दिवा अनारक्षित विशेष गाडीच्या १६ सेवा चालविण्यात येणार आहेत. यामुळे होळीनिमित्त कोकणात जाणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

एलटीटी- मडगाव- एलटीटी साप्ताहिक विशेष गाडीच्या ४ सेवा चालविण्यात येणार आहेत. यापैकी गाडी क्रमांक ०१००३ साप्ताहिक विशेष लोकमान्य टिळक टर्मिनस येथून दर सोमवारी २ आणि ९ मार्च रोजी सकाळी ८.२० वाजता सुटेल. ही गाडी त्याच दिवशी रात्री १०.४० वाजता मडगाव येथे पोहोचेल. या गाडीच्या २ सेवा चालविण्यात येतील. तर ०१००४ साप्ताहिक विशेष लोकमान्य टिळक टर्मिनस येथून दर रविवारी १ आणि ८ मार्च रोजी सायंकाळी ४.३० वाजता निघेल. ही गाडी दुसऱ्या दिवशी सकाळी ५.५० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल.

या गाडीच्या २ सेवा चालविण्यात येतील. या गाडीला ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलावडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिविम आणि करमाळी येथे थांबा देण्यात आला आहे. या गाडीची रचना १८ स्लीपर क्लास आणि २ सामानासह गार्ड ब्रेक व्हॅन अशी असेल. विशेष ट्रेन ०१००३ साठी आरक्षण २८ फेब्रुवारी रोजी सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि वेबसाइटवर सुरू होईल.

# २ दिवसांत युटीएस ॲप होणार बंद... आता सर्व तिकीट, पास रेलवन वरच

## रजिस्ट्रेशन कसं करायचं? फॉलो करा सोप्या स्टेप्स

■ **चंद्रपूर। प्रतिनिधी,**

भारतीय रेल्वेने डिजिटल तिकीट प्रणालीत महत्त्वाचा बदल करत १ मार्चपासून 'युटीएस' ॲप बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे लांब पल्ल्याच्या गाड्यांचे आरक्षित व अनारक्षित तिकीट, लोकल ट्रेन तिकीट तसेच सीझन पास बुकिंगसाठी 'रेलवन' हेच एकमेव अधिकृत ॲप असणार आहे. येत्या दोन दिवसांनंतर डिजिटल पद्धतीने तिकीट बुकिंग करणाऱ्या लाखो प्रवाशांना रेलवन ॲपचा वापर करणे अनिवार्य होणार आहे. रेल्वे प्रशासनाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, तिकीट बुकिंग प्रणाली अधिक सुलभ आणि आधुनिक करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. युटीएस ॲपमधील सर्व सेवा आता रेलवन ॲपमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

**रेलवन ॲप कसे सुरु कराल?**

प्रवाशांना अडचण येऊ नये म्हणून रेल्वेने रेलवन सुरु करण्याची प्रक्रिया जाहीर केली आहे.

- App Store किंवा Play Storeवरून रेलवन ॲप डाउनलोड करा.
- युटीएस किंवा IRCTC ॲपवर आधीपासून नोंदणी असेल तर त्याच युजरनेम आणि पासवर्डने लॉग-इन करा. नवीन युजर्स मोबाईल नंबर किंवा ई-मेलद्वारे नोंदणी करू शकतात.
- पासवर्ड लक्षात नसेल तर Forgot Password पर्याय निवडा. त्यानंतर नोंदणीकृत मोबाईलवर युजरनेम पाठवला जाईल आणि त्यानंतर OTPद्वारे नवीन पासवर्ड सेट करता येईल.
- लॉग-इन केल्यानंतर My Bookings टॅबमध्ये युजर्सना सीझन पास किंवा तिकिट पाहता येईल.

**आर-वॉलॅट आणि सीझन पास आपोआप ट्रान्सफर**

युटीएस ॲपच्या आर-वॉलॅटमधील शिल्लक रक्कम आणि चालू सीझन पास रेलवन ॲपमध्ये आपोआप ट्रान्सफर होतील. त्यामुळे प्रवाशांना नवीन अकाउंट तयार करण्याची गरज लागणार नाही. नोंदणीकृत मोबाईल नंबरने लॉग-इन केल्यास वॉलेटमधील रक्कम रेलवनवर दिसेल आणि तिकीट बुकिंगसाठी वापरता येईल. ज्यांच्याकडे आधीच वळर ॲपवरील पास आहेत, ते पास संपेपर्यंत वैध राहतील. मात्र, पुढील नूतनीकरण किंवा नवीन बुकिंगसाठी रेलवन ॲप वापरणे अनिवार्य असेल.

**सवलत आणि कॅशबॅकची ऑफर**

रेलवन ॲपचा वापर वाढवण्यासाठी रेल्वेने विशेष ऑफर जाहीर केली आहे. रेलवनद्वारे तिकीट बुकिंग केल्यास ३ टक्के सवलत मिळेल. तसेच BHIM UPIद्वारे पेमेंट केल्यास ₹.२० पर्यंत अतिरिक्त कॅशबॅकही दिला जाणार आहे.

**सर्व रेल्वे सेवा एकाच ॲपमध्ये**

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी जुलै २०२५ मध्ये रेलवन ॲपचे लोकार्पण केले होते. या ॲपमध्ये अनारक्षित आणि आरक्षित तिकिट बुकिंग, लाईव्ह ट्रेन ट्रॅकिंग, प्लॅटफॉर्म माहिती, आर-वॉलॅट तक्रार नोंदणी, फूड ऑर्डर सेवा आणि रिफंड रिक्वेस्ट अशा सुविधा उपलब्ध आहेत. वळर ॲप बंद होणार असले तरी IRCTC ॲप पूर्वीप्रमाणे कार्यरत राहणार आहे.

# मुंबईतील बहुप्रतिक्षित बेलासिस उड्डाणपूल अखेर वाहतुकीसाठी खुला...

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

नुकतंच, मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकाला जोडणाऱ्या दक्षिण मुंबईतील बहुप्रतिक्षित बेलासिस उड्डाणपुलाचं ताडदेव येथे उद्घाटन झालं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह या फ्लायओव्हरचं उद्घाटन केलं. याप्रसंगी मुंबईच्या महापौर रितू तावडे देखील उपस्थित होत्या. हे उड्डाणपूल आता वाहतुकीसाठी खुलं करण्यात आलं आहे. बेलासिस उड्डाणपुलाचा हा प्रोजेक्ट डेडलाइनच्या आधी पूर्ण झाल्याने चर्चेत असल्याचं पाहायला मिळतंय. जून २०२४ मध्ये जुना पूल पाडण्यात आला होता आणि अवघ्या १५ महिने ६ दिवसांत हा फ्लायओव्हर नव्याने बांधण्यात आला. काही कारणास्तव, या फ्लायओव्हरचं औपचारिक उद्घाटन पुढे ढकलण्यात आलं होतं.



**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नाव देणार...**

ताडदेव, नागपाडा आणि मुंबई सेंट्रलला जोडणारा हा उड्डाणपुलावर आता बेलासिस हे नाव प्रामुख्याने घेतलं जाणार नाही. कारण, आता ताडदेवच्या बेलासिस पुलाचं नाव बदलून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असं ठेवलं जाणार आहे. हा पूल ताडदेव, नागपाडा आणि मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकाला जोडतो. दक्षिण मुंबईतील बेलासिस पुलाचं नाव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावावर करण्याचा निर्णय झाल्यानंतर कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी फडणवीस यांचे आभार मानले.

**नव्या उड्डाणपुलाची वैशिष्ट्ये**

या नवीन उड्डाणपुलाची एकूण लांबी ३३३ मीटर आहे, ज्यामध्ये रेल्वे रुळांवर ३६.९० मीटरचा स्पॅन, ७ मीटर रुंद कॅरेजवे आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी दोन्ही बाजूंना रुंद फूटपाथ यांचा समावेश आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे १२० कोटी रुपये खर्च आला आहे. या पुलाचा पूर्वेकडील भाग १३८.३९ मीटर आणि पश्चिमेकडील भाग १५७.३९ मीटर आहे. तसेच, रेल्वे हद्दीत ३६.९० मीटर आहे. रस्ता ७ मीटर रुंद असून दोन्ही बाजूंना रुंद फुटपाथ आहेत.

२०२४ मध्ये बेलासिस पूल पुनर्बांधणीसाठी बंद करण्यात आल्यामुळे दक्षिण मुंबईतील प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. मुंबई मध्य पूर्व आणि पश्चिम दरम्यान प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना अनेकदा २० ते ३० मिनिटे विलंब सहन करावा लागत होता कारण त्या मार्गावरील वाहतूक ताडदेव आणि नागपाडा या गर्दीच्या रस्त्यांकडे वळवण्यात आली होती. विशेष बाब म्हणजे, उड्डाणपुलाचं बांधकाम मे २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचं नियोजित असताना, इटउ ने हा प्रकल्प चार महिने आधीच पूर्ण केला.

# घरात घुसून १४ वर्षांच्या मुलीवर बलात्कार, घाबरुन गप्प बसली

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

एका ३० वर्षीय व्यक्तीने १४ वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. या नराधमाच्या कृत्यामुळे पीडित मुलगी गरोदर राहिली आणि सोमवारी (२३ फेब्रुवारी) तिने एका गोंडस मुलीला जन्म दिला. आरोपीने तिच्यावर फक्त अत्याचारच केले नाहीत; तर पीडितेचे अश्लील फोटो आणि व्हिडिओही बनवले. पीडितेच्या वडिलांच्या तक्रारीवरून आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. उत्तर प्रदेशातील मुरादाबाद परिसरातील ही घटना आहे.

**गोंडस मुलीला दिला जन्म**

काही दिवसांपूर्वी पीडितेच्या पोटात दुखू लागल्याने कुटुंबीयांनी तिला उपचारासाठी दवाखान्यात नेले. तिथे अल्ट्रासाऊंड केल्यानंतर ती गरोदर असल्याचे समोर आले, ज्यामुळे पालकांना मोठा धक्का बसला. वारंवार विचारणा करूनही भीतीने तिने काहीच सांगितले नाही. सोमवारी तिला प्रसुती वेदना सुरू झाल्याने खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे तिने एका मुलीला जन्म दिला. त्यानंतर या संपूर्ण प्रकरणाचा उलगडा झाला आणि वडिलांनी पोलीस ठाणे गाठले.

**पीडितेला शासकीय मदत**

पोलिसांनी याप्रकरणी तातडीने पावले उचलत आरोपी सरताजला अटक केली आहे. पोलिसांनी सांगितले की, आरोपीला न्यायालयात हजर केले असता त्याची रवानगी तुरुंगात करण्यात आली आहे. तसेच, पीडितेला शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून संबंधित विभागाकडे पाठवण्यात येत आहे. पीडित मुलीला न्याय मिळवून देण्यासाठी पोलीस सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत.

**व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत अत्याचार**

हा प्रकार सुमारे एक वर्षापूर्वी सुरू झाला. पीडितेचे कुटुंबीय घराबाहेर गेले असताना आरोपी सरताज याने घरात घुसून मुलीवर जबरदस्ती केली. केवळ अत्याचारच नाही, तर नराधमाने या कृत्याचे अश्लील फोटो आणि व्हिडिओही बनवले. हे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन तो गेल्या वर्षभरापासून पीडितेवर दबाव टाकत राहिला. यामुळे घाबरलेल्या मुलीने हा प्रकार कोणालाही सांगितला नाही.



# नागपूरात महिलेला बघून तरुणामध्ये जागा झाला सैतान... चाकूचा धाक दाखवून शरीरसुखाची केली मागणी

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

नागपूरच्या शांतीनगर पोलीस ठाणे हद्दीत एका कुख्यात गुन्हेगाराने एका महिलेच्या घरात घुसून चाकूचा धाक धाकवला. नंतर त्या महिलेकडे शरीरसुखाची मागणी केली. तिने नकार देताच त्याने पीडितेकडे ५० हजार रुपयांची खंडणी मागितली. या घटनेनं परिसर हादरून गेला आहे. या प्रकरणी आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला असून ही घटना २० फेब्रुवारी रोजी घडल्याचे वृत्त आहे. या घटनेनं महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

**आरोपीनं महिलेकडे केली शरीरसुखाची मागणी**

नागपूर शहरातील शांतीनगर पोलीस ठाणे परिसरातच ही घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सुरेंद्र उर्फ मनोज समुंद्रे (वय २७) ही व्यक्ती २० फेब्रुवारी रोजी पीडितेकडे शरीरसुखाची मागणी करत होती. महिलेनं विरोध केल्याने आरोपी संतापला. त्याने पीडितेकडे ५० हजार रुपयांची मागणी केली होती.



**नंतर चाकूने मारण्याची दिली धमकी**

पीडितेनं नकार देताच मुलाला चाकूने मारण्याची धमकी देखील दिली. महिलेनं आरडाओरड केली असता, आरोपी घटनास्थळावरून पळून गेला. या घडलेल्या घटनेनंतर पीडितेनं शांतिनगर ठाण्यात तक्रार दाखल केली. यानंतर पोलिसांनी कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतले.

सांगण्यात येतंय की, आरोपी हा आठ वर्षांची शिक्षा भोगून तुरुंगातून बाहेर आला होता. काही शहरांमध्ये आरोपीविरोधात अनेक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस सध्या आरोपीची चौकशी करत आहेत आणि पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

# 'लग्नाला गेलेल्या तरुणीवर लैंगिक अत्याचार, स्कार्फसह मृतदेह...'

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

एक विद्यार्थीनी लग्नापूर्वी सुरु असलेल्या नातेवाईकांच्या कार्यक्रमात गेली होती. त्याच समारंभात ती पाण्याच्या पंपावर हात धुण्यासाठी गेली असता, पुन्हा परतलीच नाही. बराच वेळ कुटुंबियांनी शोध घेतला, त्यानंतर कुटुंबातील सदस्य बागेत पोहोचले. पण त्यांना मुलीचा मृतदेह स्कार्फने लटकलेल्या स्वरुपात झाडाला आढळून आलेला दिसला, या घटनेचा थरार संबंधित कुटुंबातील सदस्यांनी सांगितला. ही घटना बिहारच्या सुपौल जिल्ह्यातील असल्याचे वृत्त आहे.

**'मुलीवर सामूहिक अत्याचार', कुटुंबियांनी सांगितला घटनेचा थरार**

घडलेल्या घटनेनुसार कुटुंबियांनी सांगितलं की, त्यांच्या मुलीवर सामूहिक अत्याचार करण्यात आला आणि नंतर तिची निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. संबंधित मृत तरुणी ही बीए चे शिक्षण घेत होती. ती मूळची जिल्ह्यातील किशनपूर पोलीस ठाणे परिसरातील एका गावातील रहिवासी होती. ती लहानपणापासून तिच्या आजोबांच्या घरी शिक्षण घेत होती. पोलिसांना या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. सोमवारी स्थानिक पोलिसांसह जिल्हा फॉरेन्सिक टीम, सायबर पोलीस ठाणे पथक आणि डीआययू पथकाने घटनास्थळी धाव घेत पुरावे गोळा केले. घटनास्थळावरून मुलीच्या चप्पलाही जप्त केल्या आहेत. घटनेबाबत अधिकाऱ्यांनी सांगितलं की, मुलीच्या मृतदेहाची चौकशी सुरु आहे. एफएसएल आणि तांत्रिक पथकही तपासात सहभागी आहे. अर्ज मिळाल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल. बलात्काराबाबत शवविच्छेदनाचा रिपोर्ट आल्यानंतर खरं खोटं हे स्पष्ट होईल.

# दहावीत शिकणाऱ्या मुलीला दारु पाजली अन् केला सामूहिक बलात्कार

# दुकानात सामान आणायला गेलेल्या मुलीसोबत घडलं भयंकर

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

दहावीत शिकणाऱ्या एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर दोन नराधमांनी सामूहिक बलात्कार केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. घराशेजारील दुकानात सामान आणायला गेलेल्या मुलीला आरोपींनी कारमध्ये बसवून निर्जनस्थळी नेले. तिथे तिला जबरदस्तीने दारु पाजून तिच्यावर अत्याचार केला. या प्रकरणी पोलिसांनी दोन तरुणांविरुद्ध पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे. उत्तराखंडच्या नैनिताल परिसरातील ही घटना आहे.

**दारु पाजून अत्याचार**

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी दहावीत शिकत असून मंगळवारी (२४ फेब्रुवारी) संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास ती घराशेजारील दुकानात सामान आणण्यासाठी गेली होती. तिथे तिला शेजारीच भाड्याने राहणारे मोहित (२०) आणि प्रदीप (२४) हे दोन तरुण भेटले. त्यांनी तिला फिरवून आणण्याच्या बहाण्याने आपल्या कारमध्ये बसवले आणि निर्जनस्थळी नेले. तिथे पोहोचल्यावर त्यांनी मुलीला दारु पाजली आणि त्यानंतर तिच्यावर सामूहिक अत्याचार केला.

**बेशुद्धावस्थेत सापडली मुलगी**

रात्री साडेदहा वाजेपर्यंत मुलगी घरी न परतल्याने घाबरलेल्या पालकांनी पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी तातडीने शोधमोहीम सुरू केली असता रस्त्यावर एक संशयास्पद कार उभी असल्याचे दिसले. पोलिसांनी कारची झडती घेतली असता, पीडित मुलगी तिथे बेशुद्ध अवस्थेत आढळून आली. यावेळी दोन्ही आरोपी देखील कारमध्येच होते. पोलिसांनी तातडीने मुलीला वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवले आणि दोन्ही नराधमांना ताब्यात घेतले.

**आरोपींची रवानगी तुरुंगात**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणी मोहित आणि प्रदीप यांच्याविरोधात सामूहिक बलात्कार आणि पोक्सो कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी या गुन्ह्यात वापरलेली कार जप्त केली असून, आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.



# प्रियकरासमोर तरुणीवर ७ जणांकडून आळीपाळीने सामूहिक बलात्कार!

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

प्रियकरासोबत फिरायला गेलेल्या एका २८ वर्षीय तरुणीवर तब्बल ७ जणांनी सामूहिक लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. इतकेच नव्हे तर, आरोपींनी पीडिता आणि तिच्या प्रियकराकडून बळजबरीने पैसे हिसकावून घेतल्याचं वृत्त आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित घटना ही १९ फेब्रुवारी रोजी आसामच्या कछार जिल्ह्यातील सिलचर शहरात घडल्याची माहिती आहे. प्रकरणातील पीडितेने पोलिसांकडे तिच्यासोबत घडलेल्या दृष्कृत्याची तक्रार केली आणि तिच्या तक्रारीच्या आधारे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांच्या माहितीनुसार, पीडितेने दोन आरोपींची ओळख पटवली असून त्यांनी पोलिसांनी अटक केली आहे. तसेच, उर्वरित आरोपींच्या अटकेसाठी प्रयत्न केले जात असल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**७ पुरुषांकडून बलात्कार**

या प्रकरणाबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितलं की, सिलचर सदर पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध विविध कलमांअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, पीडितेची मेडिकल टेस्ट करण्यात आली असून तिचा जबाब देखील नोंदवण्यात आला आहे. त्यांनी पुढे सांगितले की, सात अज्ञात पुरूषांनी तिच्यावर आळीपाळीने बलात्कार केला आणि नंतर तिला एका आरोपीच्या खात्यात १०,००० रुपये ट्रान्सफर करण्यास भाग पाडण्यात आल्याचा पीडितेने आरोप केला आहे.

**पीडितेच्या कुटुंबियांनी दिली माहिती**

पीडितेच्या कुटुंबियांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडिता तिच्या प्रियकरासह कारमधून फिरायला गेली होती आणि सिलचर शहरापासून काही किलोमीटर अंतरावर बायपास रोडवर असताना एका एसयूव्हीमधून काही पुरुष आले आणि त्यांनी त्यांच्यावर हल्ला केला. आरोपींनी आधी त्यांना त्यांच्या घराचा पत्ता विचारला आणि नंतर अचानक पीडितेसह तिच्या प्रियकराला पकडलं. तिथे सुमारे ७ पुरुष आणि त्यांनी तिच्या प्रियकराच्या समोर आळीपाळीने महिलेवर बलात्कार केला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com